१९६८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध.
सं. क्र. १०९७

REFBK-0016597

लालजी पेंडसे

प्रकाशक : वामन विष्णु भट,

**अभिनव प्रकाशन**

७ अंबा सदन, जेरबाई वाडिया रोड

परळ, मुंबई १२.

© लालजी पेंडसे, मुंबई ४.

प्रथमावृत्ति : मार्च १९३५.

द्वितीयावृत्ति : सप्टेंबर १९६८.

मुद्रक : स. कृ. जोशी,

विमा मुद्रक आणि प्रकाशक लि., सातारा

यांचा विमा छापखाना.

## प्रकाशकाचे निवेदन :

१९३५-३६ सालची गोष्ट. या पुस्तिकेचे लेखक **श्री. लालजी पेंडसे** यांचे आमच्या शाळेत ( हिंद विद्यालय हायस्कूल ) गणेशोत्सवात व्याख्यान झाले. विषय होता '**समाजसत्तावाद.**' आम्ही काही मुले त्यांच्या त्या व्याख्यानाने अक्षरशः झपाटले गेलो. आणि त्यानंतर या विषयावर ज्या ज्या वेळी जिथे जिथे म्हणून काही चर्चा, व्याख्यान - सत्र असेल तिथे आमचे पाय आपोआप वळू लागले.

समाजसत्तावादाची शास्त्रीय आणि तात्त्विक परिभाषा आकलन होण्याचे आमचे त्यावेळचे वय नव्हते. परंतु त्यातील राजकीय भागाचे त्यावेळी आम्हाला खूप आकर्षण वाटायचे. याच भावनेतून पुढे प्रत्यक्ष राजकीय आणि कामगार चळवळीत भाग घ्यायला आम्ही सुरुवात केली आणि जी परिभाषा आम्हाला पहिल्याने कळत नव्हती ती हळूहळू आत्मसात होऊ लागली. व्यक्तिशः माझ्यापुरतेच लिहायचे तर एक 'जीवननिष्ठा' म्हणून मी त्या विचारधारेचा स्वीकार केला. '**अभिनव प्रकाशन**' संस्था या निष्ठेतूनच जन्माला आलेली आहे. तेव्हापासून मला वाटायचे की या विचाराचे रोपटे ज्यानी आपल्यामध्ये लावले त्यांचे एक तरी पुस्तक आपण प्रकाशित करावे. आतापावेतो तसा योग आला नव्हता. परंतु १९३५ साली प्रथम '**राजशेखर**' या टोपण नावाखाली प्रसिद्ध झालेल्या, आणि आज तेहेतीस वर्षानंतरही ज्यामधील विचार मुळीच जुने झालेले नाहीत अशा या छोट्या पुस्तिकेच्या पुनर्मुद्रणाच्या निमित्ताने हा योग आला याचा मला मोठा आनंद वाटतो.

या पुस्तिकेच्या सुधारित पुनर्मुद्रणाचा प्रस्ताव मी जेव्हा लालजींपुढे मांडला तेव्हा नादुरुस्त प्रकृतीचे कारण सांगून ( अर्थात, हे कारण खोटे नव्हतेच. ) त्यानी मला वाटेला लावले. परंतु मी जेव्हा त्यांच्या खनपटीलाच

बसलो तेव्हा अतिशय परिश्रमपूर्वक त्यानी या पुस्तकाच्या काही भागाचे पुनर्लेखन नव्या प्रास्ताविकासह करून दिले. मी याबद्दल त्यांचा अत्यंत आभारी आहे.

**'साहित्य आणि समाजजीवन'** या त्यांच्या दुसऱ्या 'ऐतिहासिक' प्रबंधाचे नव्या स्वरूपात पुनर्मुद्रण करायचीही उमेद मी बाळगून आहे. तो योग केव्हा येतो ते पाहू या.

**वामन विष्णु भट**

३०, ऑगस्ट, १९६८ प्रकाशक

# प्रस्तुत प्रबंधाची पार्श्वभूमी

सन १९३२ ते १९३५ या काळात महाराष्ट्रातील सुशिक्षित वर्गात व मराठी साहित्यात जे वादप्रवाद व विचारतरंग उठले त्यातील संततिनियमन व त्याच्या अनुरोधाने लैंगिक स्वातंत्र्य हे वादविचार प्रधान व प्रभावी होते. इतक्या उन्मादक व प्रक्षोभक स्वरूपात या लैंगिक स्वातंत्र्याचा पुरस्कार नवविचार शोधणाऱ्या तरुण लेखकांकडून झाला की त्याला स्वैराचार अथवा राजरोस व्यभिचार असे रूप प्राप्त झाले. 'संततिनियमन', 'प्रतिभा' व 'किर्लोस्कर' ही मासिके लैंगिक स्वैराचाराच्या पुरस्कारात अग्रणी होती.

१९२७–३२ हा काळ मोठा प्रक्षोभक होता. पूर्वी कधीही अनुभविले नव्हते अशा आर्थिक आरिष्टाच्या अवर्तनात जग गरगरत होते. संपत्तीच्या गौरीशंकरावर आरूढ झालेल्या अमेरिकेची अर्थव्यवस्था कोसळून संप व बेकारीचे खांडव उठले होते. इंग्लंड, फ्रान्स व त्यांच्यामुळे त्यांच्या पंखाखाली झाकल्या गेलेल्या आशिया–आफ्रिका खंडातील वसाहती या वणव्यात होरपळत होत्या. इंग्लंडच्या आर्थिक धमन्या व रक्तवाहिन्या आक्रसून टाकणाऱ्या सर्व धंद्यातील देशव्यापी सार्वत्रिक संपाने तर हवेत फुगा फुटावा अशी इंग्लंडची दाणादाण केली होती. फ्रान्स व इटालीतही संप लढ्यांचे थैमान झाले होते. सरकारे गडगडली होती. हाताशी वसाहती नसत्या तर हे देश लिलावात निघाले असते. या अवस्थेत संपाचा आश्रय करणारी त्या त्या देशातील संतप्त जनता लाल झेंड्याखाली जमा होऊन समाजवादाचा उद्घोष करीत होती. इंग्लंडमध्ये चांगल्या प्रमाणात व फ्रान्स इटालीमध्ये फार मोठ्या प्रमाणात नगरपालिका नि विधीमंडळातील जागा समाजवादी शक्तींनी काबीज केल्या होत्या. जर्मनीत 'राष्ट्रीय समाजवाद' हिटलरच्या नेतृत्वाखाली ताठ व आक्रमक स्वरूप धारण करीत होता तर सर्व अंतर्बाह्य संकटे पचवून रशिया पहिल्या पंचवार्षिक योजनेखाली प्रगतीची वाटचाल करीत होता.

सर्वस्वी हातावर पोट भरणाऱ्या या देशातील श्रमजीवी जनता

संपामुळे व कारखाने बंद पडल्यामुळे उपासमारीत सापडली होती. बेकार श्रमजीवी स्त्रिया पोटात काटे भरण्यासाठी वाम मार्गाचा अवलंब करीत. कुमारी माता आणि बेवारशी मुले यांचा प्रश्न डोकेदुखी उत्पन्न करीत होता. फ्रॉइडची विचारसरणी व संततिनियमनासाठी वापरावयाच्या 'टोप्या' (हेच एक साधन तेव्हा सापडलेले होते) यांचा फैलाव व आश्रय तिकडे होत होते. तात्पर्य फ्रॉईड व मार्क्स हे १९२७–३० या काळातले जगावर प्रभुत्व संपादन करणारे दुर्दमनीय असे दोन विचार प्रवाह होते.

युरोपीय मालाबरोबर हे विचार व त्याचे वाङ्मयही भारताच्या बंदरात येऊन थडकत होते. पूर्वी किरकोळ गटागटात प्रविष्ट होणारा कार्ल मार्क्स व त्याचा प्रतिक स्वरूप असा लालबावटा मंदीच्या भयचक्रात सापडलेल्या मुंबई कलकत्त्याच्या लक्षावधी कामगारांनी आणि काही प्रमाणात तरुण तेजस्वी विद्यार्थ्यांनी उभारला तर शिक्षित समाजातील लेखक व विचारी व्यक्ती चविष्टपणाने फ्रॉईडला चघळू लागल्या. झंझावाताच्या वेगाने लालबावटा व त्याचे तत्त्वज्ञान कामगार व विद्यार्थी ही क्षेत्रे व्यापत चालला होता. १९३०–३२ च्या राष्ट्रीय आंदोलनाने दोन वर्षे तो उन्मेष झाकळल्यासारखा झाला तरी १९३४ च्या प्रारंभी पुन्हा तो अधिक प्रभावाने फडकू लागला होता. विद्यार्थी त्याकडे आकृष्ट झाले तसा खुद्द काँग्रेसमध्ये त्याचा प्रवेश झाला. ( काँग्रेस सोशालिस्ट पार्टीची स्थापना ) इतकेच नव्हे तर कै. पं. जवाहरलाल नेहरू सारखी प्रभावी व्यक्ती त्याच्याकडे आकर्षित झाली होती. तात्पर्य हे की १९३४ च्या प्रारंभी मार्क्सचा समाजवाद व फ्रॉईडचा लैंगिकतावाद हे दोन प्रधान विचार मराठी समाजापुढे प्रामुख्याने उभे होते.

पण ज्यांना क्रांतिकारी समाजवाद रुचणे व पचणे शक्य नव्हते अशा अहंमन्य सुशिक्षितांनी व काही तरी नव्याची आवड असणाऱ्या लेखकांनी आणि नियतकालिकांनी फ्रॉईडच्या लैंगिकतावादाची कास धरली. खरे म्हणजे फ्रॉईडच्या तत्त्वज्ञानातला हा एक अनुषंगिक भाग होय. पण मूळ मौलिक भाग पेलण्याची कुवत नसलेल्या आमच्या उथळ लेखकांनी विवेकी विचारकांना शिसारी यावी इतका लैंगिकतावादाचा भडक व उत्तान प्रचार सुरू केला व त्याला लैंगिक स्वैराचाराचे रूप आले. 'प्रतिभा' व 'किर्लोस्कर' ही मासिके त्याची अग्रणी होत.

यात समाजशास्त्राच्या दृष्टीने या वादाचे अवगाहन करणारा तिसरा एक पंथ होता. समाजवादाबरोबर आलेल्या गॉर्की वाङ्मयाने कदाचित तो प्रभावित झालेला असेल. या पंथाचे प्रभावी लेखक कै. भा. वि. वरेरकर (विधवा कुमारी), विभावरी शिरूरकर (' कळ्यांचे निश्वास ', ' हिंदोळ्यावर ', ' बळी '), गीता साने ( वठलेला वृक्ष), ' संततिनियमन 'चे संपादक कै. र. धो. कर्वे यांच्या त्यागमय कष्टांचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. पण पुढे कर्व्यांनी व्यभिचारात अनीती नाही असे प्रतिपादन करणारे लेख लिहिल्याने ते वरील लेखकांच्या पंक्तीतून ढळले व किर्लोस्करी गटात त्यांची गणना झाली. लैंगिकतेचा विचार मांडणारा असला तरी हा तिसरा गट श्रेणीने सर्वथैव निराळा व स्वागतार्ह होता. त्यांचा आम्हा समाजवादी लेखकांनी जोरदार पुरस्कार केला होता, आजही करू.

लैंगिक स्वैराचाराचा हा जो उन्मादक व प्रक्षोभक प्रचार ' किर्लोस्कर ' मासिक व त्याच्या पंखाखालील लेखकांनी चालविला होता तो विघटना निर्माण करणारा निःसंशय होता. पण त्यांचा समाजशास्त्रदृष्ट्या विचार न करता जीर्णमतवादी सनातन्यांनी धर्म, नीती व जातिसंस्था ही अपरिवर्तनीय असल्याने व हा वाद त्याला नवमतवाद हे अभिधान प्राप्त झालेले होते–या त्रयीच्या मुळावर आलेला असल्याने त्याचा उच्छेद करण्याचे कंकण बांधले व युद्धासाठी डेरे दाखल झाले, वाक्‌युद्ध सुरू झाले.

पण आपल्या असमान विकसनाच्या देशात तात्त्विक चर्चेला सहजगत्याच फाटे फुटत जातात. इतके, की त्या फापटपसाऱ्यात मुख्य मुद्यांचाही विसर पडून त्याचा लोप होतो. याचे डोळ्यापुढचे समर्पक उदाहरण म्हणजे शिवसेनेचा उगम व परिणती हे होय. महाराष्ट्र राज्यातील मराठी माणसांच्या वास्तव गाऱ्हाण्यांची दाद लावून घेणे हे तिचे जन्मकारण. पण गाऱ्हाणी अजून वाऱ्यावरच तरंगत आहेत. तोच ' लाल बावटा जला दो 'च्या कानठळ्या बसविणाऱ्या घोषणांच्या कर्कश कल्लोळात मूळ मागण्यांचा आवाज अस्पष्ट व पुसट करीत जिथे सर्व लोकशाही मूल्यांची चिता धगधगते त्या हुकूमशाहीच्या दिवास्वप्नात शिवसेनेची परिणती व्हावी! कारण-परिणामाच्या न्यायाने याचा असा अर्थ लागतो की हुकूमशाहीच्या हव्यासासाठीच मराठी माणसांच्या भावनिक गाऱ्हाण्यांचा वापर केला जात आहे!

लैंगिक स्वैराचाराच्या प्रचाराविरुद्ध धर्ममार्तंडांनी जो धर्मध्वज उभविला त्याचे कार्य सर्वच प्रकारच्या नवमताचे खंडन असे बनविले गेले. आणि आधुनिक काळातले प्रगामी नवमत जेथून उदित होते त्या फ्रेंच क्रांतीच्या मंथनातून निष्पन्न झालेल्या स्वातंत्र्य, समता व बंधुता या गुणत्रयीच्या आहुती अहिताग्नी राजवाडे यांच्या ' सिद्धाग्नी कुंडात ' दिल्या जाऊ लागल्या. वोल्तेर, रूसो, ह्यूगो, दिदेरा यांचे ' स्त्रैण व पाखंडी ' अशा वर्णनाने चारित्र्यहनन होऊ लागले. ' पावाच्या तुकड्यासाठी हपापलेला ' असे लेनिनचे वर्णन झाले! प्रा. ना. सी. फडके यांनीही या वादात समाजवादाची टवाळी करण्यासाठी कागदावर लेखणीचे फराटे ओढले. सनातन्यांचे एक भाडोत्री वकील कै. श्री. गो. म. जोशी यांनी या वादात उत्साहाने भाग घेऊन " हिंदूंचे समाजरचनाशास्त्र " हा विवेचक ग्रंथ लिहिला, आणि जुन्या शंकराचार्यांच्या आविर्भावात दिवसा मशाली पाजळीत व नवमतवाद्यांना आव्हाने देत त्यानी मुंबईत तळ ठोकला. मुंबईत दोन तीन प्रकट सभा झाल्या. त्यात दोन्ही पक्ष बोलले, आणि भंपक लैंगिक स्वैराचारवादी वक्त्यांची जोशी यांनी चांगलीच भंबेरी उडविली. यातल्या शेवटच्या सभेला श्रोता म्हणून मी उपस्थित होतो. जीतम् मयाच्या अभिनिवेशात श्री. जोशी यांनी ' कोण असाल ते वाद-विवादाला या ' अशा तऱ्हेचे सभेच्या शेवटी आव्हान दिले. मला याचा संताप आला व आव्हान स्वीकारल्याचे मी सभेत उठून जाहीर केले. आमचा वाद मुंबईत व्हायचा, दिवस जोशांनी ठरवायचा, असे ठरले.

पण आव्हान देणे जितके सोपे तितके ते निस्तरणे सदोदित सोपे नसते. तीन महिने झाले तरी जोशी येईनात. ' मुंबईला येणे मला जमत नाही ' असे त्यानी कळवून टाकले. नंतर पुण्याच्या वसंत व्याख्यान मालेचे निमंत्रण स्वीकारून मी याच विषयावर व्याख्यान दिले. श्री. जोशी यांना उपस्थित राहण्याचे मी पत्राने कळविले होते. पण तेव्हा माझी प्रस्तुत पुस्तिका प्रसिद्ध होऊन त्यांच्या वाचनात आलेली असावी. सभेला ते आले नाहीत. एवढे मात्र खरे की त्यानंतर त्यांचे आव्हान सत्र थांबले. आणि या पुस्तिकेतून जे तत्त्वज्ञान मी मांडले आहे त्यावर उभारला गेलेला समाजवाद त्यानंतर प्रत्यक्ष साहित्य संमेलनातून व सभातून घुमू लागल्यामुळे लैंगिक

स्वातंत्र्यवाद व त्याचे खंडन करू पाहणारा जराजीर्णवाद त्या घुमाऱ्यापुढे निष्प्रभ होऊन नामशेष झाला.

— उरली ती ही पुस्तिका –'एक प्रभावी नवविचार; त्याची दुसरी आवृत्ती आज वाचकांच्या हाती पडत आहे. तेहेतीस वर्षांचा काळ मध्यंतरी वाहून गेल्याने आज नवा व अधिक चिकित्सक वाचक वर्ग उभा झाला आहे. त्याला जुने असले तरी हे पुस्तक नवे वाटेल, व कदाचित अधिक उपयुक्त वाटेल. कारण आज अनेक पक्षांच्या डेऱ्याडेऱ्यातून समाजवादाच्या नौबती झडत आहेत. प्रत्येकाचा अर्थ निराळा आहे. एकाच वादाच्या इतक्या पर्यायी अर्थांच्या कोल्हाहलात श्रद्धावान जिज्ञासू भांबावून जातो आहे. अशा वेळी समाजवादाची जी उत्क्रान्त व शास्त्रशुद्ध प्रणाली आहे तिचा जवळून परिचय जर तरुण कार्यकर्त्यांना व वाचकांना या पुस्तिकेतून झाला तर माझ्या शिणलेल्या लेखणीचे व प्रकाशकाच्या परिश्रमाचे चीज झाले, असे समाधानाने म्हणता येईल.

**— लालजी पेंडसे**

# नवमतवाद

जुन्या नव्याचा वाद काही आजचा नाही. आज जीवनामध्ये जे वाद नि संघर्ष चालू आहेत त्यांच्या मागे मागे उलट्या क्रमाने जात चौकशी करू लागलो तर निरनिराळ्या काळातून तो निरनिराळ्या निमित्ताने व रूपाने चालत आल्याचे दिसून येते. ही साखळी मनुष्य हा समाज करून राहू लागला त्या अतिपूर्व काळापर्यंत लांबवत नेली तरी असाच काहीना काही संघर्ष चालू असल्याचे दिसते. यावरून संघर्ष हाच जीवनाचा स्थायीभाव असून प्रगती त्याच्याच अनुरोधाने घडून येते असा निष्कर्ष निघतो.

जुन्या काळाबद्दल हे विधान केले तर ते मान्य करायला कोणी फारशी हुज्जत घालीत नाही. हमरीतुमरीचे प्रसंग येतात ते डोळ्यापुढे घडत असलेल्या वर्तमान संघर्षातील बीजभूत कारणांवरून येतात! अशावेळी स्थितिस्थापक मनुष्य अक्रोश करतो की समाज रसातळाला जाणार! पण पूर्वी तसे घडले नाही, आजही घडत नाही व पुढेही घडणार नाही.

फार पूर्वी म्हणजे वैदिक संस्कृतीच्या प्रारंभकाली गोमांसभक्षण होत असे की नाही यावर आपल्या संसदेत नुकतेच चमकदार खटके उडाले. राजकारणी लोकांची ती बौद्धिक आतषबाजी होती म्हणून तिकडे दुर्लक्ष करू. पण ज्ञात इतिहास असे सांगतो, की तक्षशिलेच्या आश्रमात अंगिरसांच्या यज्ञसत्रात घोड्याचे शिंगरू व गाईचे वासरू यांचे बळी दिले जात असत, व त्या समारोहासाठी जमलेले आमचे पूर्वज स्त्री-पुरुष त्या बळींचे कोवळे लुसलुशीत मांस प्रसाद म्हणून मोठ्या चविष्टपणाने सोमरसाबरोबर खात असत. सोमरसाच्या धुंदीत जमलेले तरुण स्त्री-पुरुष आणखीही काही चेष्टा करीत.[1] या क्षेत्रात मानव हा नेहमीच चंचल राहिला आहे. पण त्याच्याशी आपल्याला सध्या काही कर्तव्य नाही. विवाहसंस्थाही त्या अगोदर आजच्यासारखी नियमबद्ध नि सुस्थित नव्हती.

---

१. वोल्गा ते गंगा — महापंडित राहुल सांकृत्यायन

दा. क. ..........

पण पुढे कालक्रमाने शेतकी जीवन बरेच स्थिरावून भरभराटू लागले. अशा काळात गोमांसभक्षण निषिद्ध ठरविले गेले आणि विवाहसंस्था निर्माण करून पतिपत्नीचे जीवन स्थायी केले गेले. हा बदल होताना, दिसेल त्या मादीमागे पारव्यासारखे पिंगा घालण्यास चटावलेले आजच्या सनातन्यांचे तेव्हाचे पूर्वज परंपरागत चालीरीतीच्या नावाने वहिवाटीचा हक्क सांगत नि सोमरसपान करीत या नव्या व्यवस्थेविरुद्ध यथेच्छ तंडले असतील. पण ऐतिहासिक विकास, म्हणजे उत्क्रांतिक्रम, हा असला नाठाळ नि शिरजोर आहे, की तो वहिवाटीच्या हक्कांचा मुळीच मुलाहिजा ठेवीत नाही. गती-विसंगतीच्या संघर्षातून सिद्ध होणारी संगती काखेला मारून तो बेगुमानपणाने पुढेपुढे धावत असतो. त्याचा हा फटिंगपणा चांगला अनुभवाला आला असूनही मानव समाजातील काही अगतिमान प्राणी या उत्क्रांतिक्रमाशी लतकोडगेपणा करीत पुन्हापुन्हा चालू परंपरेचा – वहिवाटीचा – हक्क सांगतच असतात. केव्हा ते या उत्क्रांतिक्रमाच्या भोवऱ्यात सापडून अल्पकाल का होईना, गतिमान बनतात व केव्हा “ प्राप्त परिस्थितीशी मिळते घेऊन ” तगून राहतात; वहिवाटीचा हक्क मात्र निघून जातो व पुढे क्रमशः ते निर्माल्यवत बनतात.

सरंजामशाहीत समाजाचे पुढारीपण करणारे वर्ग भांडवलशाहीत निष्प्रभ होतात आणि जातिव्यवस्थेच्या निरपवाद प्रभावाच्या काळातले पुढारीपण गाजविणारे वर्ग यंत्रयुगाने जातिव्यवस्था छिन्नभिन्न केल्यानंतरच्या ‘ सब-गोलंकारी ’ अवस्थेत निष्प्रभ झालेले असतात. उलट अगतिमान राहिल्यामुळे ते अमेरिकेतील प्राचीन इंगस व माया संस्कृतीतल्या समाजाप्रमाणे भूपृष्ठा-वरून नष्ट होतात.

तथापि जिवंत असेतो पावेतो तरी जुन्याचे स्तोम गाणाऱ्याला भूतकालाची अनुकूलता म्हणजे वहिवाटीच्या हक्काचे मानीव पाठबळ असते खरेच. इतिहासाला ज्ञात अशा हिंदी संस्कृतीचा काल चार साडेचार हजार वर्षांचा जुना मानला, तर या कालाची संचित साधनसामुग्री यांच्यापाशी असते. यामुळे आपल्या परंपरागत वारशाचा पाठपुरावा करणारे आधार त्यांना हजारो ग्रंथातून काढून दाखविता येतात. नव्याचा पुरस्कार करणाऱ्यापाशी हे संचित नसते. त्याला ऐतिहासिक विकासक्रमाच्या नियमांचे विशिष्ट भौतिकशास्त्रांच्या

दृष्टीने परीक्षण करावयाचे असते व त्याची क्रमप्राप्त परिणती सांगावयाची असते. हे करावयाला दोघांपाशी भांडवल असे एकच असते, ते म्हणजे इतिहास. पण एकाला त्याचा स्वमतसाधक अनुवादक गावयाचा असतो तर दुसऱ्याला त्यात परिवर्तन घडवून आणावयाचे असते. पहिल्या प्रकारच्या आततायी लोकांबद्दल कार्ल मार्क्स म्हणतो, "The philosophers have only interpreted the world differently. The Question is to change it."

बदल करावयाचा ! हे शब्द ऐकल्याबरोबर अपरिवर्तनवादी पुराणाभिमान्यांच्या छातीत धडकी भरते. ते म्हणतात, परमेश्वराने हा सर्व पसारा निर्माण केल्यापासून आज हजारो वर्षे तो अव्याहत चाललेला आहे. ही सर्व क्रिया अबाधित आहे. याच त्रिकालाबाधित सृष्टिनियमांवर आमचा धर्म, आमची संस्कृती, आमचे समाजशास्त्र, जातिसंस्था व वर्णव्यवस्था ही उभारलेली आहेत, आणि म्हणूनच ती अभेद्य व अपरिवर्तनीय होत. या अभिनिवेशाने ते तिरशिंगरावाप्रमाणे खूप ऐट आणून परिवर्तनवाद्यांवर घाव घालण्यास सरसावतात. जुन्या शंकराचार्यांप्रमाणे दिवसा मशाली लावून आव्हान देत फिरतात.[१] परंतु अंतरीचे क्लैब्य केव्हाकेव्हा त्यांच्या डोळ्यापुढे उभे राहते : "सीदन्ति मम गात्राणि मुखंच परिशुष्यति । वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते । गांडीवं स्त्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते ॥" अशी स्थिती होऊन त्यांच्या तोंडून निराशेचे केविलवाणे शब्द निघून जातात, "मानवांमध्ये संघनिष्ठा टाकण्याची प्रवृत्ती आहे. तिला औषध नाही. हिंदूंनी जातिसंस्था हे औषध देऊन ते ३–४ हजार वर्षे प्रभावी करून दाखविले. पण त्याचे पुढे काय होईल हे भविष्य सांगणे फार कठीण आहे."[२]

या उद्गारांवरून हे स्पष्ट होते, की ज्या जातिसंस्थेच्या जीवित्वाबद्दल त्यांना स्वतःलाच फारशी आशा उरलेली नाही तिचे प्रेत ते आमच्या गळ्यात अडकवू पाहत आहेत. बरे, अवतरणातील विधाने पाहता त्यातले एक तरी खरे आहे का ? मनुष्यात संघनिष्ठा नाही किंवा ती टाकण्याची प्रवृत्ती आहे हे विधान सर्वस्वी खोटे असल्याचे प्राणीशास्त्रावरून सहज सिद्ध

---

१. गो. म. जोशी यांचे नवमतवाद्यांस आव्हान.

२. गो. म. जोशी – ' हिंदूंचे समाजरचना शास्त्र ', पान १३२.

करता येईल. आजपर्यंत हजारो वर्षे वर्ग व जातिविग्रहातील अन्याय, जुलूम, उच्चनीचता हे भेद सोशीत मनुष्य समाज करून व त्यास टिकवून राहिला हे ऐतिहासिक सत्य काय दाखविते ? कीडमुंगी, सरपटणारे व हवेत किंवा पाण्यात तरंगणारे, खुरटणारे व पायावर चालणारे, हे सर्व प्रकारचे सजीव प्राणी संघाने राहतात, ही गोष्ट तर प्राणीशास्त्रावरून सहज दिसून येतेच; पण त्याच्या मुळाशी जाऊन पदार्थविज्ञानशास्त्राकडे पाहिले तरी पदार्थ म्हणजे Matter ही अनेक परिमाणुबद्ध in mass असल्याचे दिसते. पदार्थ अशा रीतीने बद्ध असल्याशिवाय त्याला आकार, चेतना ही यायचीच नाहीत. आता मानवांचे समाज बनणे व त्यांचे व्यवहार चालणे ही गोष्ट त्यांच्या लहरीवर किंवा स्त्रैण प्रवृत्तीवर अवलंबून नाही, हे कळावयास समाजशास्त्राच्या मूलभूत तत्त्वांशी जरा जास्त परिचय असावयास पाहिजे ही गोष्ट मात्र खरी आहे. जोशांचे दुसरे वाक्य–‘ त्यावर ( संघनिष्ठा टाकण्याच्या प्रवृत्तीवर ) औषध नाही.’[१] पहिले विधानच खरे नसल्याने हे विधान अनवश्यक होय. पण लेखकाच्या दृष्टीने पाहावयाचे तर तो कबुलीजबाब ठरतो; आणि तरीही जातिसंस्था हे औषध कल्पून ते त्रिकालाबाधित राखण्याची धडपड करणे ही विसंगती ! पण हे जर औषध असेल तर ते परमेश्वराच्या लाडक्या हिंदूनीच शोधून काढले व म्हणून त्यांचा तो ‘ पेटंट ’ होय हे म्हणणे सर्वस्वी खोटे आहे. जातिसंस्था निर्माण होणे व काही काळ ती निःसंशय प्रभावी होणे हा ऐतिहासिक विकासक्रमातला एक भाग आहे. हे विवेचन पुढे येईल. सध्या एवढेच सांगतो, की हिंदूंप्रमाणेच रोमन साम्राज्यात व अमेरिकेत चातुर्वण्य व जातिसंस्था होऊन गेलेल्या आहेत. जुन्या ग्रीक वाङ्मयातील ॲग्रापाच्या सूत्रात समाजरचनेचे जे वर्णन आहे ते थेट पुरुषसूक्तातल्या समाजपुरुषाच्या चार अंगांसारखे चातुर्वर्ण्यात्मक आहे. नमुन्यादाखल मागे उधृत केलेल्या चार वाक्यातील एकही विधान खरे नाही. यावरून सनातन्यांची एकंदर समाजशास्त्रविषयक विचारसरणी कशी असेल याची कल्पना करता येण्यासारखी आहे.

---

१. गो. म. जोशी— ‘ हिंदूंचे समाजरचनाशास्त्र ’, पान १३२.

टीप : (केवळ ३५ वर्षातच काळाने जोशांचा असा सूड घेतला की त्यांच्या अपरिवर्तनवादी अभिनिवेशांचे मंडन करणाराच कुणी उरला नाही. )

आपला मोडका बाजार सजविताना आधुनिक तरुणांचा दृष्टिभेद करण्याकरिता हे लोक मोठ्या कौशल्याने नजरबंदीचे अनेक प्रकार करीत असतात. यातला मुख्य प्रकार असा आहे, की आपल्या उपयुक्तता नष्ट झालेल्या व वास्तवाचा आधार नसलेल्या अशास्त्रीय व आधिदैविक किंवा अनिमानुषी ( Mataphysical ) कल्पनांना ते आधुनिक भौतिकशास्त्रांचा आधार देऊ पाहतात. यात ओढाताण करताना त्यांची कशी फजिती होत असते पहा : 'सर्व भौतिकशास्त्रांचा पाया प्राणीशास्त्र' असल्याचे ते सांगतात. 'मनुष्य संघनिष्ठ नाही' असे म्हणत असतानाच 'संघटनेची स्फूर्ती सृष्टी-प्रणीत हेतूत आहे' असेही ते दडपून देतात. 'समाजशास्त्राच्या मुळाशी मानसशास्त्र आहे' असा अपसिद्धांत करून ते आपल्याला शीर्षासन करता येते हे सिद्ध करतात! त्यांना 'समाजरक्षण हा अभिरुचीचा प्रश्न' वाटतो. (अभिरुचीपलीकडे त्याची किंमत नाही!) 'सामान्य जनांना (सृष्टी) तत्त्व कळले तर त्याचे नैतिक मूल्य कमी होते.' अशी स्वतःची समजूत करून घेतात. म्हणून अर्थातच 'त्यांचे लक्ष वस्तुगत सृष्टीकडून ओढून ते नीतिगत सृष्टीकडे नेणे हितकारक' असे म्हणण्यात ते दोन भयंकर प्रमाद करीत असतात. 'वस्तुगत सृष्टी' व 'नीतिगत सृष्टी' म्हणजे भौतिकवाद व नीतिवाद यांची फारकत करणे आणि सामान्य जनांचा दुस्वास करणे, त्यांना अज्ञानात ठेवणे, हे ते प्रमाद होत. वर्ग वर्चस्वाची कोण ही भयंकर हाव! बरे, ही नीती म्हणजे तरी काय? तर 'स्वतःच्या संघाशी एकनिष्ठ राहण्याची जी प्रवृत्ती, तिलाच आम्ही नीती म्हणतो'[1] हे त्यांचे उत्तर! हा 'स्वतःचा संघ' म्हणजे सामान्य जनांपासून तत्त्व म्हणजे विद्या लपवून ठेवणारांचा, हे ओघानेच प्राप्त होते.

पण ज्याचे नाव काढले, की त्यांच्या कर्माची तिडीक उठते, त्या मार्क्सच्या नादी लागलेले नवमतवादी व कामगार (सामान्यजन) असे म्हणतील, की ठीक आहे तर; तुमच्याच म्हणण्याप्रमाणे आम्हा सामान्य-

---

अवतरणातील सर्व वाक्यसुमने जोशीकृत 'हिंदूंचे समाजरचनाशास्त्र' या ग्रंथातील आहेत.

१. जोशी कृत 'हिंदूंचे समाजरचनाशास्त्र' पृष्ठ १३३.

जनांचा जो संघ, त्याच्याशी आम्ही एकनिष्ठ राहू, म्हणजे नीती झाली; तर त्यांचे म्हणणे असे, की हां ! असा सवता सुभा उभाराल तर परिणामी जातिसंस्था व वर्ग मोडतील. अर्थात "वर्ग मोडण्याला मूलभूत असलेली कारणे आपल्या समाजात चोरून, लपून वा उघडउघड शिरणार नाहीत अशा पद्धतीची व्यवस्था करावयास पाहिजे. अशा रचनेमध्ये "ही वर्ग-विभागणी का केली अशा तऱ्हेचा प्रश्न विचारण्याची कोणालाही परवानगी देता येणार नाही, असे अनंत नियम करावे लागतील आणि ते व्यक्तीकडून फारच कडकपणे पाळून घ्यावे लागतील."[१]

शुद्ध फॅसिस्टाचे हे उद्गार आहेत असे म्हटले तर कोणी शिष्ट म्हणतील, 'हे संपातले भाषण झाले.' तथापि आजच्या समाजातील अंतर्गत वर्गविग्रह इतका मोकळेपणाने मान्य केल्याबद्दल नवमतवादी या लेखकाचे आभारच मानतील. पुन्हा या वावटळीतून जातिसंस्थेवर उभारलेली आपली संस्कृती व तदुत्पन्न आचार ही टिकवावयाची असल्याने ते आपले लाडके तत्त्व ठोकून देतात, "संस्कृती व आचार ही परिस्थिती निरक्षेप आहेत."[२]

पदार्थविज्ञानशास्त्रात सामान्य गती असणारास देखील माहीत आहे, की आधी पदार्थ व मग प्राणी. पदार्थ हा अनेक परमाणू संकलित होऊन बनलेला आहे. ढोबळमानाने ज्यांना आपण पंचमहाभूते म्हणतो, त्यातले प्रत्येक महाभूत विशिष्ट गुणधर्माच्या परिमाणूंनी बनलेले असल्यामुळे त्यांच्या संयोगीकरणातील प्रत्याघातातून चेतना निर्माण होते. म्हणून पदार्थात चेतना अनुस्यूत आहे. हे रसायनशास्त्राच्या सामान्य विद्यार्थ्यालाही अवगत झाले आहे. परंतु पदार्थ ही चेतनारहित जड वस्तू (dead matter) आहे, अशी १८ व्या शतकातील शास्त्रज्ञांची धारणा होती. पण पदार्थ व चेतना यांचे अभिन्नत्व असल्याचे पुढच्या शास्त्रज्ञांच्या प्रत्ययास आले. या अभिन्नता-वादी विचारप्रणालीला Monism म्हणजे अद्वैतवाद असे म्हणतात. मार्क्स-वादात ही प्रणाली कशी अध्याहृत आहे याचे विवेचन एंजल्सने एके ठिकाणी केले आहे त्याचा उल्लेख पुढे येईलच.

---

१. जोशी कृत 'हिंदूंचे समाजरचनाशास्त्र', पृष्ठ १७०.

२. जोशी कृत 'हिंदूंचे समाजरचनाशास्त्र', पृष्ठ २६८.

भारतीय तत्त्वज्ञानात या विचारप्रणालीचे दर्शन झालेले आहे. सृष्टीचा उद्गम व विकास यांच्या बुडाशी परिमाणूच आहे, — ईश्वर नव्हे, हा सिद्धान्त कपिलमुनींनी आपल्या सांख्यदर्शनात फार प्राचीनकालीच उद्घोषीत केलेला आहे. पण पुढच्या तत्त्वज्ञानातील अमूप गूढवादात हा सांख्य सिद्धान्त गडप झाला. तसे झाले नसते तर भौतिकशास्त्रांचा उदय या भारतात शतशत वर्षापूर्वी झाला असता व आधुनिक युरोपीय देशांकडे त्याला तोंड वेंगाडून पाहावे लागले नसते.

ते कसेही असो, पण १८ व्या शतकानंतर यथाकाल युरोपात पदार्थ-विज्ञानादि शास्त्रे उदयाला आली. त्यांच्या अनुरोधाने पुन्हा एकदा हे स्पष्ट झाले, की पदार्थ नसेल तर मानव असणार नाही; मानवाच्या अभावी समाज शक्य नाही; सामाजिक व्यवहाराच्या भूमिकेवाचून मानसशास्त्र संभवत नाही. शास्त्र या शब्दातच अनेक व्यक्तींच्या व्यापारव्यवहारातल्या अनुभवांची गोळावेरीज ( aggregation ) हा अर्थ गृहीत आहे. यामुळे इतर कित्येक शास्त्रांप्रमाणे मानसशास्त्र हे देखील समाजशास्त्रोत्पन्न व त्याचेच एक अंग आहे. हीच गोष्ट सृष्ट ( Natural) व समाज ( Social ) सायन्सीसची आहे. ती एकमेकांपासून तोडून निराळी पाडता येत नाहीत. मानव हा सृष्टीचा अभेद्य भाग आहे. पण समाजाच्या, तसेच निसर्गाच्या विरोधजन्य विकासात एकदा असलेले कारण ते पुन्हा परिणामवत ठरते व परिणाम कारणवत ठरतो.[1]

या विधानाचा किंचित खुलासा करणे अवश्य आहे. असे पहा, की दारिद्य, दुर्भिक्ष्य व परकीय दास्यत्व हे भारतीय स्वातंत्र्य-लढ्याचे उपाधी-कारण होत. या कारणातून संघर्ष व आंदोलने निर्माण होऊन परिणामतः स्वातंत्र्य सिद्ध झाले. यात परवशता हे कारण व स्वातंत्र्य हा परिणाम हे स्पष्ट आहे. पण इथेच मानवी धडपड थांबली नाही. स्वातंत्र्य हा परिणाम सिद्ध झाल्यानंतर, व तो सिद्ध झाला म्हणूनच, स्वातंत्र्याच्या अमूर्त कल्पनेला पूर्णत्वाने साकार करण्यासाठी, म्हणजे जेथे दुर्भिक्ष्य व परोप-जीवन असणार नाही अशा जनता प्रभुत्व लोकशाही समाजवादासाठी पुन्हा

---

1. Rubinstein – Science at cross Roads.

नवा संघर्ष सुरू झाला. म्हणजे या संघर्षाचे उपाधीकारण स्वातंत्र्य हे ठरले. या संपूर्ण घटनेतील एका टप्प्याला स्वातंत्र्य हा परिणाम घडला, तर पुढच्या म्हणजे समाजवादाच्या आंदोलनाला तोच परिणाम (स्वातंत्र्यप्राप्ती) कारणभूत झाला. या आंदोलनाचा परिणाम समाजवादाची प्रस्थापना हा होईल व त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांसाठी जो वैचारिक संघर्ष सुरू होईल, त्याचे उपाधीकारण समाजवाद बनेल. कारण परिणामवादाची साखळी अशी आहे, ती अखंड आहे. समाजजीवन व निसर्ग या दोघांनाही ती लागू आहे. उत्क्रांती तिच्या अनुरोधाने घडते. त्याप्रमाणे मानवाला मूलतः कारणीभूत असलेला निसर्ग त्याच मानवाच्या कृतीमुळे ( विकसीत होणे ) परिणामभूत ठरतो. याच अर्थाने मार्क्सने म्हटले आहे, " Thus Nature becomes one of the organs of his (man's) activity."[1] वस्तू व नीती यांची फारकत करणे, परिस्थितीनिरपेक्ष अवस्था कल्पणे, समाजरक्षण अभिरुचीचा प्रश्न ठरवणे, ही सर्व अज्ञानाची व आडदांडपणाची लक्षणे होत. कारण नीती वस्तुगत आहे. वस्तूचे उत्पादन, तिचा उपभोग व विनियोग तसेच या क्रियेचे उत्पादक वर्गावर होणारे परिणाम यातून व्यवहारपद्धती निर्माण होत असते. नीती या पद्धतीतून जन्माला येते. समाजरक्षण हा अभिरुचीचा प्रश्न नसून सामाजिक गरजेचा आहे. तसेच अभिरुची ही मनाची प्रक्रिया व मन हे पदार्थभूत म्हणजे शरीराच्या रचनेतील एक विशिष्ट घडण असल्याने ते शरीराच्या अगोदर उत्पन्न होणे अशक्य व म्हणून अभिरुचीही अशक्य आहे. वर दाखविलेल्या व्यवहारपद्धतीने समाज चालतो व म्हणून अभिरुची तीतून निर्माण होते. गुलाम पद्धतीत मानवाने ओढावयाच्या रथाची, सरंजामी पद्धतीत हत्ती – घोडे यांची, व यांत्रिक पद्धतीत मोटारीची, अशी अभिरुची बदलत असते. वल्कलापासून नायलॉन हे अभिरुचीचे पर्यटन, उत्पादन साधने व पद्धती यांच्या क्रमशः विकासावाचून झालेले नाही. पण त्याचे अधिक विवेचन ओघानेच पुढे येईल.

परिस्थितिसापेक्ष अशा चालू वहिवाटीपेक्षा नवीन कल्पना पुढे आली, की सनातनी तिच्यावर घुरकू लागतात. ' यामुळे समाज व संस्कृती, धर्म

---

1. Bukharin.

व नीती, रसातळाला जाणार ' म्हणून हाकाटी करतात; आणि तरीही नवागत कल्पनेपुढे ते मान वाकवितातच. सतीच्या चालीला बंदी, बाल-विवाह प्रतिबंध, संमतिवयाचा कायदा, अस्पृश्यता नष्ट करण्याचा कायदा, हे याचे अगदी ताजे पुरावे होत. यावरून दोन कल्पना सुचतात. एक अशी, की सनातन्यांची ओरड असत्य व लबाडीची तरी असावी, किंवा आपल्या मताप्रमाणे आचरण करण्याचे त्यांच्यात धैर्य तरी नसावे. यातले खरे काय, ते त्यांनीच ठरवावे. पण इतिहासाचा दंडक मात्र असा आहे, की तत्त्व व कृती, विचार व आचार, यांचा विरोध होऊ लागला, की तो समाज-समाजसंस्कृती-नष्ट झाल्यावाचून राहत नाही.[1]

या सृष्टिक्रमात-व मनुष्य तिचा अभिन्न भाग असल्याने मानव समाजात देखील-निरपेक्ष असे काहीच नाही. गेल्या जानेवारी महिन्यात (१९३५ साली) येथे थंडीचा कडाका पडला. थंडी किंवा उष्णता कमी अधिक होण्याला सृष्ट कारणे घडत असतात हे सर्वमान्य असल्याने त्याचे विवेचन करण्याचे कारण नाही. इराणच्या एका भागातील दाट अरण्यात हवेचे तुफान माजून ते खैबर मार्गाने भारतात पसरल्यामुळे हा थंडीचा कडाका येथे जाणवला. त्याचा परिणाम इतका दारूण झाला, की कित्येक ठिकाणी जीवहानी झाली. पिकांची अनेक ठिकाणी नासाडी झाली. याचा परिणाम बाजारांवर होऊन काही धान्ये व कापूस यांचे भाव कडाडले. याचा बरा-वाईट परिणाम मनुष्य जातीवर व तिच्या व्यवहारावर काहीना काही प्रमाणात दिसून येणार. यामुळे कुठे जीवनकलह अधिक दारूण बनणार. लाचारी-मुळे चोऱ्यामाऱ्यादि गुन्हे, व्यभिचार किंवा पोटची पोरे विकणे या गोष्टी गरीब स्त्रिया व शेतकरी यांना कराव्या लागणार. सनातन्यांच्या भाषेत बोलावयाचे तर यामुळे वर्णसंकर होणार, नीती व धर्माची हानी होणार, आणि त्या मानाने समाज व संस्कृती यांचा विघात होणार!

समजा, ह्या थंडीचा जोर आणखी वाढता व तो बरेच दिवस चालू राहता, तर कित्येक ठिकाणची जंगले उध्वस्त झाली असती. जंगल नाहीसे झाले, की पाऊस कमी झाला. यामुळे जास्त पावसाची गरज असलेली

---

1. Bukharin-Science of Cross Roads.

धान्ये पिकणार नाहीत. हवेतला ओलसरपणा (moisture) कमी होईल. त्यामुळे औषधी व इतर सामान्य वनस्पतींच्या उगवण्यावर परिणाम होईल. विशिष्ट पाखरे नष्ट होतील. रोगराई वाढेल किंवा कमी होईल. या फरकाचा मानव समाजाच्या जीवितावर परिणाम झाल्यावाचून कसा राहील ? यावरून सृष्ट अथवा कोणतीही घटना ( phenominon ) निरपेक्ष असत नाही, तर ती कारण-परिणाम बद्ध असते हे स्पष्ट होते. याला आपण सापेक्षता म्हणू. सृष्टीच्या यच्चयावत घडामोडीला हा सापेक्षतेचा नियम लागू असल्याचे आता निर्विवाद सिद्ध झाले आहे.[1]

पृथ्वीचे कवच भेदून मानव आता अंतरिक्षात भ्रमण करू लागला यामुळे या सिद्धांताला मर्यादा असल्याचे दिसून आले. पण त्यामुळे सिद्धांताला बाधा येत नाही. तथापि तो सृष्टी पलीकडचा-निराळा विषय आहे.

दुसरा प्रश्न असा, की सृष्टी स्थिर की गतिमान ? वास्तविक याचे उत्तर सापेक्षतावादात येते. गतीशिवाय सापेक्षता नाही. सृष्टी गतिमान आहे याचे प्रत्यंतर ग्रहणे, भरती-ओहोटी, दिवस-रात्र हे दृश्य प्रकारही दाखवितात. गती नसेल तर या गोष्टी घडणार नाहीत. सृष्टी गतिमान आहे हे प्रथम गॅलिलिओने व नंतर न्यूटनने सिद्ध केले. ही गती निरपेक्ष असावी असा न्यूटनचा तर्क होता.[2] पण वस्तुस्थिती तशी नसून गतीला काल व स्थल ( space-time ) यांचा अनुरोध असल्याचे आता आईनस्टेन याने सिद्ध केले आहे.[3]

सृष्टी पदार्थभूत ( matter ) होय. जे परिमाणुयुक्त आहे, जे काल व स्थलव्यापी आहे, ज्याचे मोजमाप घेता येते, ज्याचे अस्तित्व भासू शकते, ते ते सर्व पदार्थभूत होय, हा पदार्थविज्ञानशास्त्राचा सिद्धांत आहे व या सिद्धांतानुसार सृष्टी--चराचर सृष्टी--ही पदार्थभूत होय. पदार्थाला जड, पदार्थ किंवा वस्तुवादाला जडवाद असे नाव पदार्थाच्या पूर्ण स्वरूपाच्या

---

1. James Rice-Relativity.
2. Principia.
3. Einsteins' General Theory-Relativity.

(टीप : आता आईन्स्टेन यांच्या सिद्धांताबद्दलही वाद उत्पन्न झाला आहे.)

अज्ञानामुळे दिले जाते. पदार्थ जड नसून चेतनायुक्त आहे. ही चेतना गतीमुळे उत्पन्न होते. पदार्थाचे पृथक्करण करता त्याचे स्वरूप चेतना व आकर्षणयुक्त म्हणजे Electro-magnatic असल्याचे सिद्ध झाले आहे. हा शोध प्रथम फॅरेडे याने लावला व क्लार्क मॅक्सवेल याने तो पूर्णत्वास नेला. म्हणून पदार्थाला निश्चेतन मानणे अज्ञानाचे होय. या शोधावरूनच पदार्थ व चेतना matter and energy यांचे अभिन्नत्व प्रस्थापित झाले. पदार्थाच्या गती व सापेक्षता याविषयींच्या सिद्धांतानुसार यंत्रे, नौकानयनशास्त्र, तोफा-बंदुकांचे अचूक नेम, तारायंत्र, टेलिफोन, वायरलेस, रेडिओ यांची उभारणी झाली असून त्यांचे काम किती बिनचूक चालते हे आपण पावलोपावली पाहत आहो. जर सिद्धांत तर्कटी व अवास्तव असता, तर त्याचे बिनचूक प्रत्यंतर आले नसते. दृक्‌प्रत्यय हा तात्त्विक सिध्दांताचा बिनतोड व जोरदार पुरावा आहे. याच महत्वामुळे दृक्‌प्रत्ययास ' शास्त्राचे स्वरूप आले असून त्यास Emperico Science म्हणतात. या शास्त्रावर लेनिनने फार भर दिला आहे. पदार्थ व चेतना यांचे अभिन्नत्व दर्शविणारा सिध्दांत हाच खरा अद्वैतवाद ( monism ) होय व या अर्थाने मार्क्सीस्ट तत्त्वज्ञान अद्वैतवादी होय.[1]

तथापि या अद्वैत सिद्धांताच्या अनुरोधाने आपण जीवमात्राचे, विशेषतः मानवामानवांचे अभिन्नत्व म्हणतो, तेव्हा भावतः व बीजतः तो अर्थ अभिप्रेत असतो. जीवनाचे उच्चतम ध्येय ही अभिन्नता गाठणे, ही यातली मानसिक ( भावनिक ) ऊर्मी असते. पण खाजगी मालमत्तेच्या वर्चस्वाच्या अवस्थेत ही मानीव अभिन्नता वास्तविकपणे भंगलेलीच असते. म्हणजे वृत्तीभेदाने समाजाचे दोन वर्ग स्पष्टपणे पडलेले असतात. त्यांचे हितसंबंध एकमेकांना पूरक नसून मारक-विरोधी-असतात. म्हणून वस्तुतः त्यांचे अद्वैत असूच शकत नाही. यामुळेच बाकीचे सर्व अद्वैतवाद वर्गभेदावर उभारलेले असल्याने द्वैती-नव्हे, दुटप्पी-माशाकडे दृष्टी लावून बसलेल्या बगळ्याच्या -वृत्तीसारखे होत.

पण असा तर्कशुद्ध व शास्त्रशुद्ध वाद करू लागलो, की आमचे

1. F. Engels - Feurebach.

अपरिवर्तनवादी सनातनी लवचीक बनतात. ते म्हणू लागतात, ‘ सृष्टी गतिमान असेल, पण प्रगतिमान कशी ? ’[1] प्रगती म्हणजे पुढे जाणे, मग पुढे जाण्याने विकासच सिद्ध होतो कशावरून ? प्रश्न बरोबर आहे व चूकही आहे. बरोबर अशाकरिता, की प्राप्त समाजावस्थेत गती–विसंगतीच्या विरोधात सापडलेला वर्ग ऐतिहासिक गती सोडून विसंगतीच्या चक्रात सापडलेला असेल तर तो गतिमान असूनही विकास न पावता नाशाच्या खड्ड्यात पडेल. जसे, सरंजामी पद्धतीतील सत्तानिविष्ट जमीनदारशाही तेव्हाच्या उत्पादकवर्गाच्या गती व विकासाबरोबर टिकू शकली नाही, व म्हणून भांडवलशाहीपुढे ती कोलमडून पडली. आजची भांडवलशाही आजच्या उत्पादकवर्गांच्या ( कामगारांच्या ) गती व वाढीपुढे टिकाव धरू शकत नाही. म्हणून कुठे ती उलथून पडली, ( रशिया ) कुठे त्या पंथाला व सर्वत्र त्या दिशेला लागली आहे. पण समजा, समाज उलट्या गतीला लागला, म्हणजे भांडवलशाहीतील हालअपेष्टांना कंटाळून त्या टाळण्यासाठी तो सरंजामशाहीकडे वळला; किंवा सरंजामशाहीतला कुळ आपली अर्धगुलामीची अवस्था टाळण्यासाठी संघटित शेतकीव्यवसाय सोडून पारध्याच्या वन्यजीवनाकडे वळला, तर ती प्रगती नसून परागतीच ठरेल हे निःसंशय आहे. इतिहासात असे प्रकार घडलेले आहेत, आणि त्या प्रकाराचा आश्रय करू पाहणारे नष्ट झालेले आहेत. याप्रमाणे समाजातले सनातनी व त्यांच्यासारखे आणखी कोणी अपरिवर्तनशील राहिले तर ते इंगस व माया संस्कृतीप्रमाणे नष्ट होतील. या अर्थाने म्हणजे आत्मप्रत्ययाच्या दृष्टीने त्यांची शंका बरोबर आहे. आता हा प्रश्न चूक कसा ते पाहू.

विकास हा दोन पायऱ्यांनी होत असतो. पहिली पायरी म्हणजे वस्तूच्या ठिकाणी प्राप्त अवस्थेत गतिमानामुळे एका विवक्षित मर्यादेपर्यंत घडणारा प्रमाणवाचक – Quantitative change – फरक; दुसरी म्हणजे या मर्यादेपलीकडे गतिमान गेल्याबरोबर समुच्चयाने घडणारा गुणवाचक – Qualitative change – फरक. पहिल्याला उत्क्रांती म्हणतात, दुसऱ्याला क्रांती ही संज्ञा आहे. [2]

---

१. जोशी–हिंदूंचे समाजरचनाशास्त्र.

2. Bukharin–Historical Materialism.

या विधानाचा खुलासा व्हावा यासाठी दोन उदाहरणे देतो. उन्हाळयाच्या शेवटीशेवटी होणारे मुंगळे. अंड्यातून बाहेर पडणारा सूईच्या अग्राएवढा इवलासा जीव क्रमशः पूर्ण आकार घेत मोठासा मुंगळा बनतो. अंशाअंशाने पूर्णत्वाला जाणारी त्या जीवाची जी ही क्रिया, ती उत्क्रांती होय. पण पुढे लागलीच पाऊस पडू लागून थोडे दिवस जातात तोच दृष्टीपुढे चांगल्या गतीने धावणारा तो मुंगळा धावताधावताच क्षणार्धात पंख फुटून उडू लागतो. इथे मुंगळयाचे क्रमाक्रमाने वाढत जाणारे रूप एकदम बदलले. हा जो संपूर्णस्वरूपी गुणवाचक बदल झाला त्याला शास्त्रात क्रांती अशी संज्ञा आहे.

सजीव कोटीतल्या या उदाहरणानंतर दुसरे पदार्थविज्ञानातले हे उदाहरण पहा : बर्फ म्हणजे घनपाणी व अग्नी यांच्या संयोगाचे. बर्फ व अग्नी हे भिन्न गुणधर्माचे पदार्थ. त्यांचा संयोग झाला तर त्यातून आधी प्रवाही पदार्थ म्हणजे पाणी, नंतर कोंबटपणा, नंतर कढतपणा हे प्रकार उत्पन्न होतात. हा फरक प्रमाण किंवा अंशात्मक होय. कारण तो बर्फापासून सळसळणाऱ्या कढतपणापर्यंतच्या सर्व अवस्थातून खेळणाऱ्या पाण्याच्या घन किंवा प्रवाहीपणातले कमी अधिक प्रमाण दाखवितो. यात पाण्याचे मूलभूत स्वरूप बदलत नाही. याला उत्क्रांती म्हणतात. ही क्रिया काही काळ अशीच गर्भस्थ– Sub-teranian – अवस्थेत चालू असताना पाणी व उष्णता यांचे गतिमान जोराने वाढत असते. असे होता होता उष्णता अमूक मर्यादे-पलीकडे, म्हणजे अमूक एका उष्णतामानदर्शक अंशाच्या पलीकडे गेल्याबरोबर गरम होऊन सळसळणाऱ्या, म्हणजे अत्यंत गतिमान झालेल्या पाण्यातून निवळ पाणी व निवळ उष्णता यापेक्षा स्वरूपतः व गुणतः भिन्न असे बाष्पतत्त्व–वाफ–निर्माण होते.

हा गुणात्मक (Qualitative) फरक एकदम घडला, याला क्रांती म्हणतात. पाणी व अग्नी यांच्या भिन्न गुणधर्मामुळे गर्भस्त संघर्ष सुरू होऊन गती मिळाली व तिच्यामुळे वाफ निर्माण झाली. वाफ या पदार्थामुळे समाजव्यवहाराला अधिक मदत झाली. उत्पादनाचा वेग वाढला, ते अधिक होऊ लागले. व्यवहार उत्पादनावर चालतो. म्हणून वस्तूविनिमयाचा व्यवहार वाढला. अर्थात यामुळे उत्पादक वर्गाची व त्याबरोबर उत्पादनाचीही वाढ होणे हा विकास होय.

यावरून प्रगती किंवा परागती ठरविण्याचे मोजमाप निश्चित होते. ते असे, की जेव्हा समाज निसर्गाकडून आपल्या गरजा भागवून जास्त बचत होईल इतके प्राप्त करू शकेल, अशा तऱ्हेचा निसर्ग व मानव यांचा संबंध असेल तेव्हा त्या अवस्थेला प्रगती असे म्हणतात. उलटपक्षी जेव्हा गरजा भागविण्याइतकेही समाजाला निसर्गाकडून प्राप्त करता येत नाही अशा तऱ्हेचा हा संबंध असेल तेव्हा या अवस्थेला परागती असे म्हणतात. म्हणजे समाजविकासात उत्पादन व गरजा यांच्यामध्ये असलेली समांतररेषा त्या दोहोंच्या प्रमाणात बदल होईल त्या मानाने बदलत असते. या रेषेला शास्त्रीय परिभाषेत अस्थिर किंवा दोलायमान समतोल (Unstable equilibrium) असे म्हणतात. प्रगती असेल तेव्हा तिला भावदर्शक (With Positive indication) अशी संज्ञा आहे आणि परागती असेल तेव्हा अभावदर्शक (With negative indication) अशी संज्ञा आहे. याचा अर्थ असा, की प्रत्येक विकास-घटना ही तिच्यातील गती व विरोधावरून आणि त्यातील विसंगती किती प्रमाणात कमी झाली यावरून, म्हणजे उत्पादकवर्ग व उत्पादनाशी तिचा असलेला संबंध यात पडणाऱ्या फरकावरून ठरवायची असते, असे म्हणता येईल. Genuine Science studies all phenomena in their state of motion, in the antitshesis and in the development which eleminates the Contradictions.[1] यालाच विरोधजन्य विकासवाद– Dialectical materialism – म्हणतात व या अर्थाने सनातन्यांनी प्रगतीविषयक केलेला प्रश्न चूक ठरतो.

येथपर्यंत प्रमाणतः शुष्क वाटणारे हे तात्त्विक विवेचन वाचून कोणी म्हणेल, अहो, प्रश्न मानव समाजाबद्दलचा आहे. तेव्हा आता हे अंतराळीचे भ्रमण सोडून मानवात या. पण या सूचनेतील विचारसरणी सृष्टी म्हणजे निसर्ग व मानव यातील भेदावर उभारलेली असल्यामुळे भ्रामक आहे. कारण गतिमान व म्हणून चैतन्ययुक्त पदार्थाच्या विशिष्ट प्रकारच्या घडणीची विशिष्ट परिणती म्हणजे प्राणिजात-मनुष्य. अर्थात मनुष्य पदार्थापेक्षा निराळा, ईश्वराने सोवळे नेसून पदार्थापेक्षा निराळ्या तत्त्वापासून

1 Karl Marx—Critique to Political Economy.

घडविलेला, ही कल्पना गूढवादी कवींची किंवा ठाण्याच्या ठाणदारांची असली पाहिजे. मानव व निसर्ग यांच्या अभिन्नत्वामुळे सृष्टीचे नियम समजून घेतल्याशिवाय मानवसमाजाचा – समाजशास्त्राच्या ऐतिहासिक विकासाचा – नीट बोध होणार नाही. या अर्थाने हे विवेचन अवश्यच होते.

येथे मी नवमतवादाचा पुरस्कार करीत आहे. नवमतवाद हा शब्द अनेक अर्थांनी व तऱ्हांनी आजकाल उपयोगिला जात आहे. यामुळे नसती सादृश्यता उत्पन्न होऊ नये, म्हणून येथे थोडा खुलासा करणे आवश्यक आहे. आतापर्यंत मी जे विवेचन केले ते वस्तुगत सापेक्षतेचे समर्थन करणारे आहे. सापेक्षतेमुळे निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या परिस्थितीत ज्या सामाजिक गरजा उत्पन्न होतात त्या भागवीत समाजविकास करणे हा ऐतिहासिक सिद्धांत ठरतो. यालाच ऐतिहासिक भौतिकवाद अथवा मार्क्सवाद किंवा समाजसत्तावाद म्हणतात. व त्याच अर्थाने येथे नवमतवाद या शब्दाचा उल्लेख केला आहे. या दृष्टीने आता मानवसमाजाच्या उलाढालीचे विहंगावलोकन करू.

सृष्टिक्रमविषयक ज्ञान ज्यामुळे प्राप्त होते त्याला निसर्गशास्त्र म्हणजे नॅचरल सायन्स व मानवसमाजविषयक ज्ञान प्राप्त होते त्या शास्त्राला सोशल सायन्स ऊर्फ समाजशास्त्र अशी नावे आहेत. पहिल्यात पदार्थविज्ञान, खज्योतीष वगैरे, व दुसऱ्यात अर्थ, मानस, राजकारण वगैरे शास्त्रांचा अंतर्भाव होतो. निसर्ग व समाज यांच्या विकासाला काही नियम व काही सूत्रबद्धता असलेली दिसतात. याचे कारण काही काही लोक असे मानतात, की सृष्टीला हेतू आहे. या मताला Teleology असे म्हणतात. पण दगड, माती, पाणी, सप्तर्षी, ग्रह यांना विचार करणारे मन असत नाही व त्यामुळे त्यांना हेतूही असणे शक्य नाही. यामुळे सृष्टीला हेतुदाता निराळा असावा लागणार व तो परमेश्वर होय, असा या लोकांनी समज करून घेतला. याला Theology म्हणतात. हेतुदाता स्वतंत्र ( सृष्टीहून भिन्न ) मानला म्हणजे सृष्टीच्या प्रक्रियेपासून हेतूही स्वतंत्र ठरतो. पण हे मत शास्त्रशुद्ध नाही. कारण हेतुदाता निराळा मानला, की त्याचे अस्तित्व पदार्थापासून निराळे पडते. कारण सृष्टी पदार्थभूत आहे हे विवेचन मागे आले आहे. अस्तित्व म्हणजे आकार आलाच. पण आकार, मन ही पदार्थभूत असल्याने

पदार्थभिन्न अस्तित्वाची कल्पनाच चुकीची ठरते, आणि मानीव परमेश्वराला शास्त्रात – वास्तव सृष्टिव्यवहारात – स्थानच राहत नाही.

प्रत्येक क्रियेला, घटनेला कारण लागते, तसा तिचा काही परिणामही घडत असतो. परंतु शास्त्रीय ज्ञानाच्या अभावी इंद्रियांना हे कारण पुष्कळदा अदृश्य व अगम्य असते व म्हणून तेथे हेतुदात्याचे उसने अधिष्ठान मनाच्या समजुतीकरिता कल्पिलेले असते. परिणामाचेही तसेच आहे. असंघटित म्हणजे वर्गविग्रहाने पछाडलेल्या समाजात समाज व व्यक्ती यांचे हेतू व इच्छा यात विसंगती व विरोध दिसून येतात. म्हणून अपेक्षित परिणाम घडून येत नाहीत. असे झाले की त्याला यदृच्छा, दैव या अवांतर कारण-परंपरा चिकटविण्यात येतात. उदाहरणार्थ, (१) मनाजोगता नफा मिळविता यावा व एकूण धंदा आपल्या हातात राहावा म्हणून प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम करण्याकरिता सट्टेबाजारात एखादा सटोडिया एखाद्या वस्तूची साठण करून बाजार अडकवून धरतो. याला Cornering म्हणतात. पण यात ‘ चलण ’ चुकविण्याच्या वेळी रोख पैसा भरपाई करता न आला तर त्याला दिवाळे काढावे लागते. (२) रोमन्स, नेपोलियन, मराठे यांनी आपल्या भरभराटी-करिता नवेनवे प्रदेश काबीज करण्यासाठी स्वाऱ्या करण्याचा सपाटा लावला. पण शेवटी तेच — त्यांची राज्ये व सत्ता — नष्ट झाले. (३) अधिक नफा मिळविण्याच्या हेतूने भांडवलदार युद्धे करतात, पण त्यामुळे अनेकदा व अनेक मार्गांनी समाजविघटना होऊन क्रांती होते व तीत भांडवलशाही सत्ता कुंठित होते. (व्हिएतनामच्या युद्धामुळे अमेरिकेची अवस्था कशी झाली आहे हे इथे ताडून पाहावे.) तर केव्हा भांडवलशाही सत्ताच नष्ट होते — जसे रशिया. म्हणजे यात, हेतूचे अपेक्षित परिणाम व प्रत्यक्षपणे प्राप्त होणारे परिणाम यात विरोध आला. याच समाज पद्धतीला अनुलक्षून ‘ मा फलेषु कदाचन ’ असा उपदेश करण्यात आलेला असावा. उलट ‘ जेव्हा समाज खालपासून वरपर्यंत एका हेतूने बद्ध व जागृतपणे संघटित म्हणजे एकसंघ असेल, म्हणजे जेथे वर्गविग्रह नसेल, तेथे व्यक्ती व समुदाय यांचे हेतू व क्रिया यांचा समन्वय घडेल; यामुळे अपेक्षित परिणाम व प्रत्यक्ष परिणाम यांच्यामध्ये विरोध येणार नाही व म्हणून यदृच्छा, दैववाद यांना जागाच राहणार नाही. यावरून प्रत्येक घटना कारण-परिणामांनी बद्ध असल्याचे व ती

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र०
१०५७१५८ वि. विभाग

भौतिक असल्याचे सिद्ध होते. या दृष्टीने सामाजिक इतिहास तपासू लागलो, की निरनिराळ्या वेळी कसकशी स्थित्यंतरे झाली, ती का झाली, त्यावेळी वस्तुस्थिती व विसंगती यांचे स्वरूप काय होते हे कळून येते, ऐतिहासिक क्रम उपलब्ध होतो व त्यावरून भविष्यकालाची घडण कशी होणार, कोणत्या तत्त्वांवर होणार, याचा अंदाज करता येतो; ' पुढे काय होणार, देव जाणे ' असे म्हणण्याची पाळी येत नाही.

या विवेचनात आपण सारा भर इतिहासावर देत आहो, पण इतिहास म्हणजे काय, असा जर आपण मनाला निक्षून प्रश्न केला तर उत्तर देणे तितके सोपे जाणार नाही. तसेच, छाननी केल्यास दिलेली बरीचशी उत्तरे चूक किंवा अपुरी असल्याचेही दिसून येईल. म्हणून इतिहासाची शास्त्रशुद्ध कल्पना आपल्याला नीटशी असली पाहिजे.

आजपर्यंतची इतिहासाची कल्पना म्हणजे १ ) संधी–विग्रहांची संगतावर टाचणे, २ ) प्रतिभासंपन्न थोर विभूतींचे पराक्रम म्हणजे कृती आणि ३ ) त्या वेळच्या शिष्ट म्हणजे प्रमुख वर्गाचे बौद्धिक हेतू यांची कालानुक्रम वारीने गोळा केलेली माहिती, अशा व्याख्या सापडतात. थोर व्यक्तींच्या हेतूची साधना याचे नाव इतिहास; इतिहासाचा विधाता श्रेष्ठ विभूती होय. कार्लाईल म्हणतो, प्रतिभावान विभूतींच्या पराक्रमाची नोंद म्हणजे इतिहास ! (पण कार्लाईलची विभूतीच कशाला, आजकाल छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल तरी काय निराळे चालले आहे ! ) इतिहासाची एकदा अशी व्याख्या केली म्हणजे त्या त्या थोर विभूतींच्या भावना व त्यांच्या कृती यांच्या मागच्या सामाजिक घडामोडी व प्रेरणा अर्थशून्य ठरणार. इतिहासाचे वस्तुगत स्वरूपच नष्ट होणार. यामुळे त्या त्या काळचा समाज निष्क्रिय व अचेतन ठरणार ! मग दिवसभर शेतीची कामे करून रात्री शिवाजीने योजिलेल्या मोहिमा मारणे या मराठी शेतकऱ्याच्या वृत्तीला अर्थच राहणार नाही. शिवाजीपेक्षा काकणभर जास्त पराक्रमी राणा प्रतापाला संख्याबलाच्या अभावी अरवलीच्या डोंगरात लपतछपत आयुष्य का कंठावे लागले व शिवाजीच्या मागे हजारो मावळे भूरभूर धावत का सुटले ? महापराक्रमी नंद राजांना प्रजेचा पाठिंबा का मिळाला नाही, व चंद्रगुप्त मौर्याला सहस्रावधी दरिद्री पहाडी लोकांचे पाठबळ का मिळाले ? ज्या महाराष्ट्राने

शिवाजीच्या पाठीशी आपल्या क्षात्रतेजाची दैदिप्यमान वलये निर्माण केली त्याच महाराष्ट्राने १८५७ चा पुढारी नानासाहेब पेशवे याला का साहाय्य केले नाही ? त्याच्या हाकेला ओ देऊन समशेर उपसून बाहेर पडणारे किती मावळे, मराठे निघाले ? १८५७ च्या उठावात यच्चयावतत व्यापारी वर्गाने इंग्रजांनाच का साहाय्य केले ? असल्या अत्यंत महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांची उपपत्तीच लागत नाहीशी होते व इतिहासशास्त्र कुंठीत होते ! ही अनवस्था मार्क्सच्या उपपत्तीने टळते. ही उपपत्ती म्हणजे, घटनाभूत इतिहासकाली एकंदर समाजाची भौतिक स्थिती काय होती; उत्पादनाची गती व त्यातील विरोधबिंदू यांचे स्वरूप काय होते; त्या त्या घटनेचा समाजाच्या जीवितावर काय परिणाम घडत होता; उत्पादकवर्गाची वाढ होत होती की कुचंबणा होत होती; ज्याला इतिहासकर्ता म्हणावयाचे त्याच्या अंगीकृत कार्याचे परिणाम या उत्पादक वर्गावर काय होणार होते; याची संगती लावली, तिच्या प्रकाशात पाहिले, म्हणजे अनिर्बंध खंड व कर लादणाऱ्या एकमुखी राज्यपद्धतीचा प्रतिनिधी जो राणाप्रताप, त्याला, जमाबंदी करून–म्हणजे जमिनींची प्रतवारी ठरवून कायमधारा पद्धती रूढ करणाऱ्या आणि गंगायमुनेचे कालवे काढून शेताला पाणी उपलब्ध करून देणाऱ्या अकबराविरुध्द फार काळ टिकाव धरणे शक्यच नव्हते, हे स्पष्ट होते. कारण त्यावेळचे खरे उत्पादकवर्ग जे छोटे शेतकरी व कुळे, त्यांचा अकबराच्या व्यवस्थापद्धतीमुळे अनियंत्रित रजपूत राज्यपद्धतीतील त्रास व जुलूम टळणारा होता. अर्थात अकबराच्या जमीन महसूलपद्धतीमुळे कुळांचा विकास होत होता व म्हणून त्यालाच–त्याने ठरविलेल्या पद्धतीलाच–उत्पादकवर्गाचे पाठबळ मिळणे शक्य होते ही गोष्ट स्पष्ट होते. अशी संगती लावल्यानेच इतिहासाची उपपत्ती लागते व म्हणून खरे इतिहासशास्त्र हेच होय.

या दृष्टीने समाजेतिहासाचे निरीक्षण करू लागलो तर त्यात वेळोवेळी समाजपद्धती बदलत गेल्याचे दिसून येते. हा बदल ( अंश–प्रमाणात्मक ) काही काल नदीच्या प्रवाहाप्रमाणे संथपणे, तर केव्हा तो ( गुणात्मक ) धरणीकंपासारखा व त्वरित झालेला आहे आणि त्याच्या बरोबरच विवाह, नीती, धर्म, संस्कृती, शासनसंस्था यांचे स्वरूप बदलत गेले आहे. आपल्याला माहीत आहे, की एके वेळी विवाहसंस्था अशी नव्हतीच. पण पुढे विवाह

घट्ट लागले ते बहीण व भाऊ, आई व मुलगा, बाप व लेक यांच्यात व त्यानंतर अगदी जवळच्या नातेवाईकात होत असत.[१] यमी ही बहीण यम या भावाला आपली कामेच्छा तृप्त करावयास सांगते, अशी आमच्या ऋग्वेदात कथा आहे.[२] अर्जुन स्वर्गात अपल्या बापाकडे, म्हणजे इंद्राकडे गेला असता इंद्राची अप्सरा जी उर्वशी ती त्याच्यावर मोहित होऊन रति-सुखाची मागणी करते; पण उर्वशी ही जशी इंद्राची अप्सरा, तशीच आपला पूर्वज जो पुरूरवा, त्याची काही काळ पत्नी होती या जाणिवेने तो कबूल होत नाही, हे पाहून ती कसा युक्तिवाद करते पहा: 'स्वजनकभुक्ता माता म्हणुनि त्यजिति सुधी न वसुधेते.[३] म्हणजे भूमी ही आपली माता. तिचा आपल्या पित्याने उपभोग घेतला होता- ( नांगरली होती ) म्हणून शहाणा (पुत्र) त्या भूमीचा त्याग करीत नाही, (तोही नांगरतोच) यावरून माता-पुत्र समागम त्यावेळी अशक्य नव्हता असे दिसते. नंतर मुलीने वाटेल त्याची पसंदगी करून लग्न करावे, हा स्वयंवराचा प्रकार रूढ झाला. सगोत्र व सपींड बंदी तेव्हा नव्हती. वडील भावाने लग्न करावे व उरलेल्या सर्व भावानी त्या स्त्रीचा उपभोग घ्यावा, हे द्रौपदीच्या उदाहरणावरून, तसेच तिबेटाकडील हिमालयाच्या पायथ्याच्या एका भागात व केरळमधील नंबुद्री ब्राह्मणांच्या प्रथातावरून दिसून येते. लग्नानंतर पती हयात, पण फार दिवस बेपत्ता असला तर तशा स्त्रीने दुसरे लग्न करावे, असे नळ जिवंत असता, दमयंतीच्या घोषित झालेल्या स्वयंवरावरून दिसते. कौटिल्याने तर दंडकच घालून दिलेला होता. त्याने ऋतुप्राप्त स्त्रीला दहाच महिने वाट पाहायला सांगितले आहे. त्या अवधीत पती घरी परत न आल्यास खुशाल दुसरा नवरा करावा; नवऱ्याने राज्यद्रोह केला तर त्याला टाकून दुसरा करावा. कौटिल्याचा हा दंडक पाहून आजचे राजकीय चळवळे खास घाबरतील ! मातुलपक्षीय नातेवाईक किंवा गुणसंपन्न राजा यांशी संततीप्राप्त्यर्थ नियोग करण्याला त्याची परवानगी आहे.[४] महाभारतात पंडू माद्रीला तेच

१. S. V. Karandikar.— Hindu Exogamy.
२. ज्ञानकोश, प्रस्तावनाखंड, ऋग्वेद. भारतीय विवाह-संस्थेचा इतिहास-राजवाडे.
३. मोरोपंत - आर्याभारत.
४. कौटिलीय अर्थशास्त्र प्रदीप-टिपणीस.

सांगतो -- " मद्वचने संपादी सन्मुनिपासूनि शुद्ध संततिला "[१] काडीमोडही होत असे. स्वतः कृष्णच द्रौपदीला सांगतो, " कृष्णे काडीमोडी, काय तुला दीन मानिले शवसे, जे राज्यभ्रष्ट कितव, ज्यांच्या ठायीं न मान लेश वसे "[२] एकमेकांच्या संमतीने काडीमोड करण्याला कौटिल्याचीही अनुज्ञा आहे. [३]त्याचा शिष्य चंद्रगुप्त याने तर विधर्मी सेल्युकसच्या मुलीशीही लग्न केल्याचे प्रसिद्धच आहे. कौटिल्य मोठा व्यवहारी दिसतो. तो म्हणतो, 'ज्यात सर्वच राजी त्यात काय वावगे[४] ?' याच्याही पुढे जाऊन तो ऋतुप्राप्त कुमारिकांना संभोगस्वातंत्र्य देतो, हे पाहून आमच्या सनातन्यांची काळजे थिजून जातील ! " ऋतुप्राप्तीनंतर तीन वर्षांनी अविवाहित कन्येशी सवर्णीयाने संभोग केला तर, व तीन वर्षांपेक्षा अधिक काळ झाल्यास असवर्णीयाने संभोग केला तर ते कृत्य दंडनीय नाही; मात्र हा समागम संमतीने झालेला असावा "[५] पूर्वजांची ही अनुज्ञा मान्य करायला आहे का कोणी सनातनी तयार ? यानंतर सतीची चाल निघाली व आता निषिद्धही झाली. केवढाले हे धर्म व नीतिकल्पनातले फरक ! आणि तरीही आमचे पढतमूर्ख धर्म व नीती यास अपरिवर्तनीयच म्हणणार !

विवाह व धर्माप्रमाणे इतर बाबीतही फरक पडले आहेत. प्राचीन ऋग्वेदकाली विवाह व धर्म यांचा संबंध नव्हता. हा संबंध पुढे आला.[६] विंटरनिट्झ तर असेच मानतो, की " वैदिक संस्कृती ही मुख्यतः भौतिक (grossly materialistic) होती. आध्यात्मिकता व सत्वप्रधानता ही तीत बौद्धधर्मामुळे आली. " ऋग्वेदाच्या प्राचीन सूत्रात जातिभेद, वर्णभेद नव्हते. धंद्यावरून कौटिल्याने जाती पाडल्या व त्यांनी आपला विहित धंदा न करणे, किंवा अन्य जातींचा धंदा करणे, हा गुन्हा ठरविला.[८] वर्ण

---

१. मोरोपंत -- आर्याभारत.
२. मोरोपंत - आर्याभारत.
३. ४. ५. कौटिलीय अर्थशास्त्र-टिपणीस.
६. ७. S. V. Karandikar-Hindu Exogamy व ज्ञानकोश, प्रस्तावनाखंड, ऋग्वेद.
८. कौटिलीय अर्थशास्त्र प्रदीप-टिपणीस.

आणि जातिव्यवस्था ही अशा रीतीने पूर्णतः भौतिक, आर्थिक स्वरूपाची होय, ती जशी हिंदुस्तानात उत्पन्न झाली तशीच व त्याच कारणाकरिता अन्यत्रही झाली. बोलिव्हिया व पेरू येथे प्राचीन काळी इंगस (Ingus) नावाची संस्कृती होती. तीत चातुर्वर्ण्य होते व सर्व सत्ता ब्राह्मणांच्या (Priests) हाती होती. याला Organic School असे नाव आहे. रोममध्ये प्लेबियन्सचे (गुलामांचे) बंड झाले तेव्हा एका पाद्र्याने त्यांना पुराणातील कथा (menenious Agrippa) सांगितली. त्यातील वर्णन थेट पुरुषसूक्तातल्यासारखे आहे. "The hands may not rebel against the head; for otherwise, the entire human body would be ruined" याचा अर्थ तो असा सांगतो : "The ruling Class (priests) is the head. Workers and the slaves are the arms and the legs. As arms and legs may not replace the head in nature, it is well for sub-ordinates to hold their peace." याचा अर्थ असा की : "हातांनी डोक्याविरुद्ध बंड करू नये. तसे केले तर संपूर्ण शरीरच नाश पावेल." याचे स्पष्टीकरण त्याने असे केले आहे : "नेता वर्ग (पुरोहित) हा डोके होय. कामगार व गुलाम हे (शरीराचे) हातपाय होत. निसर्गतः हातपाय हे डोक्याची जागा घेऊ शकत नाहीत. म्हणून खालच्यानी शांत राहावे हे चांगले."

मराठी जुन्या क्रमिक पुस्तकात पोट व अवयव यांच्या भांडणाची गोष्ट याच संग्रहातून दिलेली आहे. धर्माचे प्राधान्य चातुर्वर्ण्याबरोबर बोकाळले. पण बुद्धकालीन बंडाने त्याचा पोकळपणा उघडकीस आणला व चाणक्याने प्राप्त अवस्थेत बंडापासून वर्गीय सत्ता टिकवून धरण्याकरिता सामाजिक पायाच बदलला. धर्माला मागे टाकून त्याने अर्थाला प्राधान्य दिले. 'अर्थ एव प्रधानः'[१] आणि या 'अर्था'चे जेणेकरून जतन व संवर्धन होईल, असे नियम त्याने घालून दिले. आपल्या 'अर्थशास्त्राचा' खुलासा तो असा करतो : 'मनुष्याणां वृत्तिरर्थः । तस्याः पृथिव्या लाभपालनोपायः

१. कौटिलीय अर्थशास्त्र प्रदीप-टिपणीस.

शास्त्रमर्थशास्त्रमिति '[1] कायमधारापद्धती, राज्यातर्फे कर्जे देणे, खाणी व बंदराचा व्यापार राज्याच्या नियंत्रणाखाली आणणे, या सुधारणा त्याने केल्या. शेते न कसणे, संप करणे, आरोप्याला मदत करणे, हे गुन्हे ठरविले. सूत कातणे व विणकाम करणे ही कामे विधवा, अपराधी पण दंड भरण्यास असमर्थ स्त्रिया, जोगिणी, मुरळ्या, वृद्ध राजदासी व वेश्या यांचेकडून करवून घेणे असा दंडक घातला. माणसांचा क्रयविक्रय करणे, वांझ गाई मारणे, ब्राह्मणाच्या उत्तरक्रियेला गाईचा बळी देणे, (गवालंभ) गुलामांचा व्यापार करणे, हे सर्व प्रकार तेव्हा होते ते बंद पाडले. तसेच ह्याकाळी मनुष्य-मांसभक्षण प्रचलित होते हे 'मनुष्यमांसविक्रये वधः' या दंडकावरून दिसून येते. श्रीमान व्यापाऱ्यांचे धन लुटून सरकारी खजिना भरावा हाही एक प्रबंध होता.[2] आर्यनीती व संस्कृतीयांचे हे चित्र रमणीय आहे-नव्हे का? ज्या सामाजिक दडपणाखाली अस्पृश्यता निर्माण करण्यात आली त्याच ओझ्यामुळे ती काढून टाकण्याची आज हाकाटी चालली आहे. समाजाची हलकी कामे करण्याकरिता हक्काचा व स्वस्त मोलाचा मजूर पाहिजे, म्हणून निर्माण केलेली अस्पृश्यता. आता अस्पृश्य संप करून 'समाजाला नाडतात' व म्हणून घाण साचते; अर्थात 'भंग्याची खोड मोडण्याकरिता' दुसऱ्यांनी ते काम करून अस्पृश्यता घालविण्याची तातडीची गरज उत्पन्न झाली आहे.[3] अस्पृश्यता नष्ट करण्याचा केवढा हा उदात्त हेतू! असल्या उदाहरणांची जंत्री हजारांनी भरेल.

ही उदाहरणे देण्याचे कारण हे, की मानव समाजाच्या इतिहासात वेळोवेळी फरक घडले असून ते 'कारण-परिणाम' या तत्त्वप्रणालीने बद्ध आहेत, हे स्पष्ट व्हावे. ही प्रणालिका समजून घ्यावयाची तर त्या फरकांची भौतिक उपपत्ती लावली पाहिजे. ही उपपत्ती आता पाहू.

समाजजीवन उत्पादनावर चालते. या उत्पादनक्रियेतील साधने व उत्पादकवर्गाचा त्याच्याशी असलेला संबंध यांच्या स्वरूपानुरूप समाजाची

---

१. कौटिलीय अर्थशास्त्र प्रदीप-टिपणीस.
२. कौटिलीय अर्थशास्त्र प्रदीप-टिपणीस.
३. 'किर्लोस्कर' (जानेवारी १९३५) मधील लेख-सावरकर.

राहणी, करणी, आचारविचार, नीतिनियम व निर्बंध म्हणजे संस्कृती ठरत असतात. हा ऐतिहासिक सिद्धांत मार्क्स व एंजल्स यांनी प्रस्थापित केला.[१] अर्थात उत्पादनसाधन व उत्पादकवर्ग यांच्या परस्पर संबंधात फरक पडत जातो तसतशी नीती व संस्कृती बदलत जाते. मार्क्सीस्ट तत्त्वज्ञानाची ही किल्ली इतिहासाच्या बंद दालनांना लावून पाहिली म्हणजे त्यात साठविलेली ही कारणप्रणालिका दृग्गोचर होते व होत गेलेल्या परिवर्तनांची सुलतेभने उपपत्ती लागते. युरोपातील रिफॉर्मिस्ट चळवळीवर एंजल्सने लिहिलेल्या Peasants War in Germany या पुस्तकात या मुद्याचे उत्कृष्ट विवेचन आले आहे. या दृष्टीने पाहता समाजेतिहासाचे तीन भाग पडतात. आरंभकाल, खाजगी मालमत्तेचा काल व समाजसत्तावादाचा काल. यापैकी पहिल्या कालाचा संगतवार असा इतिहास फारच क्वचित सापडतो. तथापि प्राणिशास्त्र, कृषि, कलाशास्त्र, ऋग्वेदाच्या प्राचीन ऋचा व काहीसे व्युत्पत्तिशास्त्र यांच्या आधारे तर्क करावयास जागा आहे. त्यावरून या कालात दिसते, की खाजगी मालमत्ता नव्हती; नीती व आचार हे संघनिष्ठेवर उभारलेले होते; संघातील सर्व घटक समतेने राहत; उच्चनीचता तेव्हा नव्हती. कारण उत्पादनाभावी श्रमशक्तीला (Labour Power) आर्थिक मूल्य प्राप्त झालेले नव्हते. म्हणून तेव्हा जाती व वर्णभेद नव्हते. पुनर्जन्माची कल्पना नव्हती. गंगा नदी, तांदूळ यांचा ऋग्वेदाच्या प्राचीन ऋचात उल्लेख नाही व गाईचा खाण्याकडे उपयोग सांगितला आहे. यावरून तेव्हा शेतीला धंद्याचे स्वरूप आले नव्हते. यावरूनही खाजगी मालमत्तेचा पाया तेव्हा घातला गेला नव्हता असेही दिसते. संस्कृती समुच्चयवाचक होती. पुढे जमिनीची लागवड करण्याची विद्या अवगत झाल्यामुळे मानवश्रमाला आर्थिक मूल्य प्राप्त झाले. उत्पादनाची ही गरज भागविण्याकरिता कुटुंबसंस्था उत्पन्न झाली व ती अबाधित राहण्याकरिता विवाहसंस्था श्रम परिमाणाच्या (Labour Unit) तत्त्वावर उत्पन्न झाली. विवाहसंस्थेवर उभारलेली कुटुंबसंस्था रूढ झाली त्यावेळी खाजगी मालमत्ता प्रचलित झाली होती व ती आपल्या कुटुंबात टिकून राहायची तरवंशसातत्य आणि (Law of inheritance)

---

1. Marxist Theory of Historical Process. (From Science at Cross Roads.)

वारसा हक्काचे विधीनियम अनिवार्य होत. येथे श्रम परिमाण हे कुटुंबसंस्थेचे स्वरूप बदलून वंशवृद्धी हे स्वरूप आले. नीती यामुळे कुटुंबाधिष्ठित बनली. यामुळे चालिरीती व संस्कृती बदलली.[1] आरंभकालचे दृश्य असे आहे. शेवटचा काल अजून नुकताच उदय पावत असल्याने त्याचे भरपूर साहित्य अद्याप उपलब्ध व्हावयाचे आहे. ( पस्तीस वर्षांपूर्वीचे हे विधान आहे. पण आता पुष्कळच साहित्य, तंत्रकलेतले व संशोधनातले नवनवे उच्चांक, सामाजिक जीवनश्रेणी यांचे बरेच ज्ञान व अनुभव उपलब्ध झाले आहेत.) यात उत्पादन साधने व उत्पादकवर्ग यांचे पूर्वसंबंध आमूलाग्र बदलतात. म्हणजे ते अन्योन्यविरोधी न राहता अन्योन्याश्रयी व पूरक बनतात. स्पर्धेऐवजी सहकार्य हा पाया बनला म्हणजे जीवनपद्धती व संस्कृती व्यक्तिप्रधान न राहता सामुदायिक-समाजप्रधान बनते. यात एकूण आचार-विचार व नीती यांचे परिवर्तन घडून संस्कृती ही ईश्वरदत्त ( काल्पनिक ) न राहता खरीखुरी मानवी ( व वस्तुनिष्ठ ) बनणार हे उघड आहे. या दोन कालांचा असा निरास झाला म्हणजे मधली पद्धती—अर्थात ‘ खाजगी मालमत्तेचा काल ’,— ही शिल्लक राहते. आज वाङ्मय, साहित्य-साधन-संपदा जी उपलब्धआहेत ती सर्व याकालाची होत. यात जे प्रमुख बदल झालेले दिसतात त्यावरून या कालाचे पुन्हा तीन मुख्य खंड पडतात : सरंजामी सत्तेचा उदय, तिचा बीमोड व व्यापारी सत्तेचा उदय आणि तिचा लय व औद्योगिक भांडवलशाहीचा उदय.

सरंजामी पद्धतीच्या उदयकाली शेतीचा प्रसार होऊन कुटुंब व विवाह-संस्था स्थापन झालेली होती. शेतीच्या धंद्याला गुरांची, पावसाची, उन्हाची, हवामानाची गरज होती. या गरजेपोटी प्रथम त्यांचे स्तोत्र गाऊन महत्त्व वाढविणे जरूर होते. गुरांचे रक्षण करणेही जरूर होते. यामुळे गाईबैलांना खाणे निषिद्ध ठरविले गेले, एवढेच नव्हे, तर त्यांना मारणे किंवा त्यांचे अपहरण करणे हा मोठा गुन्हा ठरला. गाईबैल हे मुख्य उत्पादनसाधन ठरल्याने त्यांचा मोठा संग्रह केला जाई. मुख्य लढाया गोधनाप्रास्त्यर्थ होत व गुन्हेही त्यांच्या चोरीचेच असत. महाभारतात ठिकठिकाणी गोधनहरणाच्या

1. Dialectics of Nature - Engels as quoted in Historical Materialism - Bukharin.

कथा आहेत. 'सौभद्र' नाटकातले 'चोरांनी निज धेनु चोरिल्या' हे अर्जुनाचे पद सर्वांनाच अवगत आहे.

वेदवाङ्मयामध्ये उपमाही गाईबैलांच्या आहेत. उदाहरणार्थ, 'वासराला पाहून गाय जशी हंबरते, तसे इंद्रासमोर बसून ऋषी आनंदाने मंत्रगीते गात आहेत', ही उपमा पहा. त्यावेळचे राष्ट्रीय (नेता) दैवत इंद्र होते व त्याला सन्मानदर्शक म्हणून वृषभ हे नाव दिले गेले होते. आज जर एखाद्या अपरिवर्तनवादी पंडिताला बैलोबा म्हटले, तर वेदाचा हा दाखला दाखवूनही त्याचे क्रोधशमन होणार नाही व नसलेली शिंगे उपसून तो तुमच्या अंगावर धावून येईल. पाऊस, वारा व उन्हाच्या अनुक्रमे वरुण, मरुत व सूर्य या देवता कल्पिल्या गेल्या. त्यांच्या प्रार्थना पाहिल्या तर त्या सकाम – देवाणघेवाण स्वरूपाच्याच दिसतात. इंद्र हे युद्धदैवत होते. पण खाजगी मालमत्ता निर्माण झाल्यावर तिचे रक्षण ही महत्त्वाची बाब ठरली. त्यामुळे इंद्राचे लगलीच उच्चाटन होऊन रक्षणकर्ता विष्णु याला राष्ट्रीय दैवताच्या जागी स्थान प्राप्त झाले. वरुणसूक्त ही खिस्ती साम्स(Psalms) काव्याशी साम्यदर्शक होत.[१] यावरून कल्पना सामाजिक गरजेतून निर्माण होते व म्हणून त्यावर वंश, समाज किंवा देशांचा मालकी हक्क सांगता येत नाही.

शेतीचा उद्योग वाढावा व भरभराटावा याकरिता वरुण व सूर्याच्या उपासना करूनच केवळ मानव थांबला नाही. तो त्याला तितकासा खात्रीचा मार्ग वाटला नसावा. कोणती पिके केव्हा पेरावी, केव्हा उतरावी, केव्हा कोणते पीक चांगले येते, कोणत्या हवेत कोणते पीक मातब्बर उतरते हे ठरवायचे तर खज्योतिषाची माहिती पाहिजे. या गरजेतून ज्योतिषशास्त्र तेव्हा उदित झाले. मालमत्ता रक्षणार्थ घरे, दुर्ग पाहिजेत. मोजमापाकरिता गणित व भूमिती तयार झाली. या विद्या व मुख्यतः उत्पादन म्हणजे कृषिविद्या – आपल्याच वर्गात राहावी म्हणून वंशसातत्य अवश्य झाले. याकरिता विवाह निकटवर्तीयात करण्याचे ठरले. पण पुढे शेतीचा खूपच पसारा होऊन आर्य दूरवर पसरू लागले, तेव्हा अडचण उत्पन्न होऊन अनुलोम – प्रतिलोम विवाह करणे भाग पडले. तसेच जादा

१. ज्ञानकोश–प्रस्तावनाखंड.

श्रमशक्तीची गरज उत्पन्न झाली ती गरज अनेक पत्नीत्वाच्या चालीने भरून काढली गेली. यामुळे वर्ण व रक्तसंकर होऊ लागला. अशा रीतीने म्हणजे अनुलोम-प्रतिलोम विवाहामुळे आर्य, द्रवीड, मंगोलो द्रवीड यांची मिळून हिंदु जात तयार झाली.[1] महाराष्ट्रातले ब्राह्मण पंचद्रावीड मानले जातात. शेतीच्या उत्पादनार्थ श्रमशक्तीची वाढती उणीव गुरांना व मनुष्यांना धरून भरून काढण्यात आली. याला गुलामांची पद्धती म्हणतात. तथापि रोमन गुलाम पद्धतीशी तिची तुलना करता येणार नाही. आर्य-अनार्यांची युद्धे, चातुर्वण्य, शासनसंस्था याच काळात उदयास आली. पुन्हा नीतिकल्पना बदलली. ती संघवाचक न राहता चातुर्वण्यावर उभारली गेली. उत्तरवेद, ब्राह्मणे, सूक्ते, उपनिषदे, श्रुती यातील नीती, समाज व संस्कृती यांच्या कल्पना मूलतः या गरजांवर उभारलेल्या आहेत.[2] ही संस्कृती मानव रक्तावर पोसली जाई. जरूर लागेल तेव्हा त्यांनी वाटेल तेवढे गुलाम धरावे व गरज संपली, की त्यांची बेलाशक कत्तल करावी. हा प्रकार रोमन इतिहासात प्रामुख्याने दिसतो. रखेल्या ठेवण्याची चाल या पद्धतीतूनच बोकाळली असावी. या काळात संस्कृतीची भेसळही पुष्कळ झाली. शिव दैवत मानले जावे हा या भेसळीचा व आर्य-अनार्य युद्धाच्या परिणतीचा परिणाम होय.

यापुढे आऊते व नांगर सुधारले. निसर्गशक्तीवर मनुष्याने ताबा मिळविला. दळणवळण वाढले. समाज फार पसरला. शास्त्रे निर्माण झाल्याने उत्पादन तंत्र ( Technology ) बदलले. यामुळे गुलामपद्धती भारभूत होऊ लागली. तिचा उत्पादनसाधनाशी, म्हणजे जमिनीच्या मालकीहक्काशी जोराचा संघर्ष होऊ लागला आणि तिजवर उभारलेली रोमन साम्राज्ये नष्ट झाली. बुद्धाच्या बंडाने सामाजिक स्थित्यंतर घडवून आणले.

उत्पादनाच्या विस्तारवाढीच्या यापुढील काळात विनियोगाची आवश्यकता वाढली. गुलाम जाऊन कुळे आली व कारागीर कसबी वाढले. वाहतुकीची

---

1. Hindu Exogamy – Karandikar.

2. (A) Origin of world agronomy by-Vavilov. (B) Dialectics of Nature – Engels (C) Historical Materialism – Bukharin.

साधने व रस्ते वगैरे वाढले. यामुळे वाणिज्य–व्यापारपद्धती निर्माण झाली. चाणक्याचे सुप्रसिद्ध ‘ अर्थशास्त्र ’ याचवेळी निर्माण झाले. त्यातील समाजव्यवस्था व नीतिनियम यांचा आपण मागे परिचय करून घेतला आहे. त्याची संगती या भौतिक वस्तुस्थितीशी लागते. वाढत्या गरजा भागविण्याकरिता उत्पादनाची कार्यक्षमता वाढणे व तदनुरूप तंत्रपद्धती ( Technology ) निर्माण होणे अवश्य आहे. याकरिता धंद्यानुसार जाती, अशी वाटणी होणे हे त्यावेळचे तंत्र होय. यामुळे हस्तव्यवसायात वंशपरंपरा निर्माण होऊन कार्यक्षमता ( Efficiency ) उत्पन्न झाली व वाढली. धंदेप्रधान जाती असणे ही व्यवस्था काही निवळ हिंदुस्तानचेच वैशिष्टय नव्हे. उत्पादनाच्या या विशिष्टकाली युरोपात देखील ही पद्धती निर्माण झाली होती. तिला Guild म्हणतात; तथापि परिणामदृष्टया जातिसंस्था व Guild -- संघ–यात फरक आहे हे खरे आहे. जातिसंस्था हे चातुर्वर्ण्याचे वाढत्या उत्पादनामुळे झालेले उत्क्रांत स्वरूप होय. वाहतुकीच्या गरजा भागवायच्या तर समुद्र, नद्या यांचा उपयोग केला पाहिजे. याकरिता भरती–ओहोटीचे नियम कळले पाहिजेत. यामुळे ख–ज्योतिषाचा अधिक अभ्यास झाला. न्यूटनचा सुप्रसिद्ध गुरुत्वाकर्षणाचा शोध लागला. त्यातून पुढे मॅग्नेट–लोहचुंबक सापडला. त्यामुळे समुद्रपर्यटनाची सिद्धता झाली. मोठाल्या जहाजांची आवश्यकता भासली. त्याकरिता धातू पाहिजेत. खाणी–कामाची वाढ झाली. गुरुत्वाकर्षणाच्या शोधामुळे गतिमानाचे नियम कळले. अचूक नेम मारण्याची युक्ती सापडली. धातू सापडल्या. मग तोफा–बंदुकांना काय वेळ लागणार ? चाणक्याने खाणी व बंदरे यावर सरकारी नियंत्रण का ठेवले असेल याचा आता उलगडा होतो. दर्यावर्दी, व्यापारी व कारागिरी जीवितामुळे अनेक खालचे वर्ग तसेच स्त्रिया यांना आर्थिक मूल्य प्राप्त झाले. ( कारण पुरुष बाहेर जात व स्त्रिया दारच्यादारी धंदा करीत असत.) अर्थातच यामुळे सामाजिक राहणीकरणी, चालीरीती व त्यावर उभारलेल्या नीतिकल्पना बदलल्याशिवाय कशा राहणार ? विशिष्ट कामे करणारांचे व्यावसायीक गट वाढले. भारतात अशा व्यावसायीक गटांच्या जाती बनल्या व व्यवसाय जातिनिविष्ट बनले. गट बदलण्याची युरोपात असलेली मुभा भारतीय जातींना नव्हती. उत्पादनसाधन, तंत्र नि या वाढीबरोबर अधिक उत्पादन, अधिक सामाजिक

प्रगती, भरभराट ही झाली व अनेक कला निर्माण झाल्या. यात पॉवरलूम हा अत्यंत महत्त्वाचा होय. तो युरोपात उदयाला आला व त्याने एकंदर सामाजिक घडण बदलून टाकली.

पॉवरलूम युरोपातच का निर्माण झाला याचे उत्तर देणे शक्य आहे; पण येथे तितका अवकाश नाही म्हणून एवढेच सांगतो, की भौतिक वस्तुस्थिती वर दर्शविल्यासारखी होती, म्हणजे जेव्हा नौकानयनशास्त्र निर्माण झाले तेव्हा समुद्रपर्यटनास हिंदु संस्कृतीत बंदी घातली गेली होती. तोफा, बंदुका, पॉवरलूम वगैरे तत्सम शोध परिणामतः येथे लागले नाहीत. सुबत्तासंपन्न देश, आहे ते राखावे या बुद्धीचा, व दुर्भिक्ष्यवान समाज पाहिजे ते शोधून काढावे, या बुद्धीचा असतो. ही त्याची ऐतिहासिक गरज असते. युरोपीय समाज दुसऱ्या प्रकारच्या स्थितीत होते व म्हणून तेथे शोधांची प्रवृत्ती बलवान असल्याचे दिसून येते.

यांत्रिक उत्पादनात हस्तव्यवसायातले उत्पादनाचे तंत्र बदलले. यामुळे कार्यक्षमता कमाविण्याकरिता मुद्दाम निर्माण केलेल्या जातींची उपयुक्तता खरोखर संपली. जेथे यांत्रिक उत्पादन अद्याप फार वाढले नाही तेथे हिंदुस्तानप्रमाणेच अजून जाती कोणत्या ना कोणत्या स्वरूपात जगून आहेत. पण विजेचा मुबलक पुरवठा होऊन औद्योगिकता वाढली, की त्या राम म्हटल्याशिवाय राहणार नाहीत. मग कोणी कितीही ऊर बडवून घेवो! ( भारतात आता यंत्रोत्पादन बरेच वाढले असून व्यवसाय जातीच्या चाकोरीबाहेर पडले आहेत. ब्राह्मण, लोहाराचा व चांभार शिक्षकाचा धंदा राजरोस करतो ! ) याची अंधुक कल्पना आल्यामुळेच आमचे सनातनी पंडित विवंचनेत पडले आहेत. ' यापुढे जातिसंस्थेचे काय होणार ते कळत नाही ' असे नक्राश्रू ढाळीत आहेत.[१] पण त्यांच्या या प्रश्नाचे अगदी साधे उत्तर हे, की ज्या ऐतिहासिक गरजेतून जाती निर्माण झाल्या ती गरज संपल्यामुळे त्या आता नष्ट होणार यात शंका नाही. तरीपण व्यावसायिक कारणांमुळे मूलतः पडलेल्या जातींना पुढे जन्मकारणरूप प्राप्त झालेले असल्याने उपयुक्तता नष्ट झाली तरी त्या काही काळ तगून राहणारच. शिवाय राजकारण जातियतेचे मळे शिंपत असल्याने तिला जीवदान मिळते आहे.

---

१. हिंदूंचे समाजरचनाशास्त्र– जोशी.

ऐतिहासिक उपयुक्तता नष्ट झालेली संस्था अगर वर्ग आंधळ्या अभिनिवेशामुळे टिकवून धरले तर कशी अनवस्था उत्पन्न होते याचे ढळढळीत उदाहरण बुवाबाजी हे होय. ती केव्हा निर्माण झाली असेल ती असो, पण ती ' बाजी ' चाणक्याने राजकीय हेतूंकरिता संघटित व संवर्धित केली. चाणक्याच्या पूर्वी झालेल्या बंडाचा अद्याप उपशम झाला नव्हता. त्याने चंद्रगुप्ताला पुढे करून नंदाचा पाडाव केला तरी नंदनिष्ठ लोकांची कारस्थाने अजून चालूच होती. त्यामुळे प्रत्येक खेडोपाडी, घराघरातून काय चालले आहे, याची बातमी मिळविणे जरूर होते. याकरिता त्याने सद्वर्तनी संन्यासी, गोसावडे, जोगी, ब्राह्मण, विधवा यांना हेर बनविले व त्यांचे स्वतंत्र खाते निर्माण केले. या विधवा स्वयंपाकिणींच्या नात्याने लोकांच्या घरात शिरून बातमी काढीत तर संन्यासी व साधू दैवीचमत्कार, मंत्रतंत्र, जादूटोणे, ज्योतिष या मिषांनी लोकांच्या अंतःकरणात प्रवेश करीत. त्यांच्या शिष्यांनी ते वाटेल तितके दिवस उपाशी राहतात, रोग बरे करतात, भूतपिशाचे काढतात, दैवीचमत्कार करतात, अशा कंड्या पिकवाव्या. संकटग्रस्त माणसांची वित्तंबातमी आणून गुरूला सांगावी व आपल्या योगिक सामर्थ्याने आपण ती जाणली असे म्हणून त्या माणसास चकित करावे वगैरे आज्ञा कौटिल्याने केल्या आहेत.[१] पुढील काळात हेरांची पद्धत बदलली व या वर्गाचे कार्य संपले. आता ते नुसतेच चाणक्यप्रणित युक्त्या योजून लोकांना फसवून लुबाडण्याचे काम करीत असतात.

यांत्रिक उत्पादनामुळे आर्थिक व सामाजिक पद्धतीत विलक्षण क्रांती झाली. वस्तूचा व्यवहार द्रव्यात सुरू झाला. यामुळे हुंडणावळी ठरून सर्व मागणीपुरवठ्याचे-देवघेवीचे-व्यवहार घाऊक बाजाराच्या व बँकांच्या आधीन गेले. दळणवळणाची यांत्रिक साधने निर्माण झाल्याने जुने बलुते, निरोपे गेले. संयुक्त कुटुंब व ग्रामसंस्थांची गरज संपून आर्थिक घटकदृष्ट्या ती नामशेष झाली व होत आहेत. जातिनिविष्ट समाज धंदेनिविष्ट बनू लागला. (आधुनिक कामगार) मोठ्या प्रमाणात व सामुदायिक रीतीने उत्पादन होऊ लागल्याने वैयक्तिक व कौटुंबिक जीवनपद्धतीवर उभारलेल्या चालीरीती

---

१. कौटिलीय अर्थशास्त्र प्रदीप- टिपणीस.

नष्ट होऊन नवे सामुदायिक रीतिरिवाज व चालीरीती निर्माण झाल्या. तात्पर्य, वाटेल त्याला वेळाशक धरून राबवावे व गरज संपली, की कत्तल करावे, किंवा हाकून द्यावे, या नीतिकल्पना आता गुन्ह्यात जमा झाल्या. इतकेच नव्हे, तर राबायला संमती व नंतर पेन्शन इतके नीतीचे व विचारांचे परिवर्तन झाले. म्हातारपणी पेन्शन देऊन मनुष्याची तरतूद करण्यात अध्याहृत असलेली भूतदयाबुद्धी आजची नाही. चाणक्यानेही बाळंत व गरोदर स्त्रिया, म्हातारे, अपंग वगैरे लोकांच्या पोषणाची जबाबदारी राजावर टाकली आहे. ही मानवी कल्पना, जेव्हा सामाजिक गरजा भागवून उत्पन्नाची बचत (Surplus) होऊ लागली तेव्हा सामाजिकरीत्या उदयाला आली. चाणक्यकाली तिच्या बुडाशी दुसरी एक कल्पना होती. ती म्हणजे नुकत्याच होऊन गेलेल्या बंडाचे अद्याप पूर्ण उपशमन न झाल्याने पसरलेल्या तीव्र असंतोषाचा निरास करणे, ही होय. वर्गप्रधान समाजातील दयावादाची भौतिक उपपत्ती अशी आहे. जातिसंस्थेची उपयुक्तता नष्ट झाल्यावर तिजवर उभारलेली उच्चनीचता, विवाह, विशिष्टाधिकार, संस्कार, हीं नष्ट होणार, हे तर्कसिध्द आहे. तसे झाले म्हणजे नीती व संस्कृती यांच्या कल्पना तरी कशा कायम राहतील ? अर्थात नाही. ही क्रिया आज चालू असलेली दिसते. स्त्रियांचा वारसाहक्क, निरीश्वरवाद, काडीमोड, मिश्रविवाह, धार्मिक कल्पनांचे उच्चाटन, स्त्रिया व अस्पृश्यादि वर्गांच्या समतेच्या चळवळी, वर्णभावनेच्याऐवजी एक राष्ट्रीयत्व भावना, असे हे अंशवाचक म्हणजे उत्क्रांतिदर्शक प्रश्न उत्पन्न होत आहेत व सोडविले जात आहेत. तशाच उत्पादकवर्गाच्या सामाजिक व आर्थिक समतावाचक क्रांतिकारक चळवळीही होऊ लागल्या आहेत. पण कोणतीही सामाजिक चळवळ निव्वळ सामाजिक किंवा आर्थिक असू शकत नाही. या चळवळींचा मूलभूत पाया आर्थिक खरा; पण त्या तितक्याच प्रमाणात राजकीयही असतात. कारण खाजगी मालमत्तेवर उभारलेल्या प्रत्येक ऐतिहासिक कालखंडात कोणता ना कोणता तरी वर्ग सत्तानिविष्ट असतो. उत्पादनाची साधने त्याच्या अंकित असतात. म्हणून उत्पादकवर्गांची स्वातंत्र्य व समतेची चळवळ ही त्या सत्ताधारी वर्गाच्या मालकी हक्काविरुध्द होत असल्याने तिला साहजिकच राजकीय व सांस्कृतिक स्वरूप येत असते, हा ऐतिहासिक सिध्दांत

लेनिनने विशद करून सांगितला आहे.[१] अर्थात या लढ्याच्या अंती धर्म व नीती, आर्थिक व सांस्कृतिक कल्पना यात बदल व्हावयाचा हे क्रमप्राप्तच होय.

यांत्रिक उत्पादनाच्या आजच्या काळातला सत्ताधीश वर्ग भांडवलदारांचा आहे. अधिक नफा, अधिक उत्पादन हा त्यांचा परवल-धर्म आहे. या उत्पादनप्रक्रियेला अधिकाधिक कामगारांची गरज आहे. ते मिळविण्यात स्पृश्यास्पृश्यता, ग्रामसंस्था, संयुक्त कुटुंबसंस्था यांचा अडथळा होत आहे व म्हणून ती सुधारणेच्या नावाखाली मोडली जाण्याची क्रिया आज समाजात होत आहे. याचे उत्कृष्ट उदाहरण गिरण्यांचे होय. आज संपाचे पुढारीपण विणकरांकडे आहे. त्यांची खोड मोडायची तर सूत कातणाऱ्या स्पीनर्समधून विणकर घेतले पाहिजेत; पण ते अस्पृश्य आहेत ही अडचण उत्पन्न होते. ती अडचण अस्पृश्यता नष्ट केल्याने दूर होईल. गिरण्यांचे मालक याकरितां ती घालवायला आतुर झाले आहेत. अशा रीतीने भांडवलशाही पद्धतीच्या प्रागतिक कालात, म्हणजे उत्पादकवर्गाचा विकास होत असतो तोपर्यंत, शास्त्रांची व समाजव्यवहाराची एकूण प्रगती होत जाते. तशी ती आतापर्यंत झाली व पूर्वी केवळ अतर्क्य, अगम्य व दैवी वाटणाऱ्या अनेक सिद्धी, मानवाने निसर्गावर ताबा मिळविल्यामुळे, दासी बनून त्याच्या पायाशी राबू लागल्या. शास्त्रीय तर्कक्रमात येथपर्यंत खेचले गेल्यानंतर आमच्या अपरिवर्तनवाद्यांजवळ शास्त्रीय भांडवल उरत नाही व म्हणून ते येथे अडवणुकीच्या मार्गाचा अवलंब करतात. वरील विवेचन ऐकून ते म्हणतात, ठीक आहे; एवढी सर्व प्रगती झाल्याच्या बढाया मारता तर आजचा मानव एकंदरीने सुखी व समृद्ध का असू नये ? प्रगतीचा मूळ हेतू मानवाचे सौख्यच ना ? मग त्या ऐवजी आज पाहावे तिकडे मानव संकटग्रस्त, दुर्भिक्ष्यमान व पतित का दिसावा ? हा सर्व तुमच्या भौतिक-आसुरी संपत्तीचाच प्रताप नव्हे का ?

प्रश्न महत्वाचा व विचार करण्यासारखा आहे. त्यातील विधान प्रश्नकाराइतकेच आम्हाला सुद्धा मान्य आहे. पण त्याची छाननी करू

---

१. मार्क्सिझम-लेनिन.

लागलो तर त्याच्या कारणांविषयी-आणि त्यातून सुटका करुन घेण्याच्या मार्गाविषयी -आमचा व प्रश्नकारांचा मूलतः विरोध येतो.

आतापर्यंच्या विवेचनात आपण हे पाहिले, की सृष्टी व मानवसमाज ही गतिमान आहेत. ही गती कारणबद्ध आहे. गतिविसंगतीच्या संघर्षातून विकास घडतो. याला आपण संगती म्हणू. शास्त्रीय परिभाषेत या क्रियांना Thesis, anti-thesis & synthesis असे म्हणतात. या गतिमानात काही काल अंशवाचक बदल होत जातो. ही क्रिया अमुक मर्यादेपर्यंत गेली, की प्रगती कुंठित झाल्याने त्या मर्यादांचा एकदम स्फोट होऊन त्यातून गुणवाचक-आमूलाग्र फरक घडतो. विकासक्रमाच्या या नियमाला धरून आपण येथवर ज्या खाजगी मालमत्तापद्धतीचा विचार केला, ती कोणत्या पायरीला येऊन पोचली आहे हे समजून घेतले तर आज घडत असलेल्या कुचंबणेचे कारण उघड होईल व त्यातून बाहेर पडण्याचा मार्गही स्पष्ट दिसू लागेल.

जमिनींच्या लागवडीतून उत्पन्न झालेल्या खाजगी मालमत्तेचा, यांत्रिक उत्पादनाच्या औद्योगिक भांडवलशाहीपर्यंत जो विकास झाला. पण भांडवलशाहीचे स्वरूप सावकारी (Monopoly) बनल्यानंतर भांडवलशाही पद्धतीत अंतर्गत असलेली विसंगती अधिक तीव्र झाल्याने तो विकास थांबला. ही विसंगती उत्पादनाचे स्वरूप सामाजिक व त्याच्या साधनांची मालकी खाजगी यात आहे. ती अशी : भांडवलशाही पद्धतीतील उत्पादनक्रियेत वैयक्तिक प्रेरणाभाव (Private enterprize) हा नष्ट होतो व ती क्रिया समाईक व यांत्रिक बनते. याचा अर्थ असा, की यांत्रिक उत्पादनाचे तंत्र ज्या श्रमविभागाच्या पद्धतीवर उभारले आहे, त्यात कोणतीही वस्तू एकहाती होत नाही. ही वस्तू तयार होण्यातील क्रियाविशेषागणिक (Process) श्रमविभाग केला जातो. उदाहरणार्थ, खिळा घेऊ. हा खिळा पूर्वी एकच लोहार करीत असे. पण आता तो ज्या कारखान्यात तयार झाला त्यातील कोणत्याही एका कामगाराला म्हणता येणार नाही, की तो मी तयार केला. लोखंड तापविण्याची क्रिया कामगारांच्या एका गटाने केली; खिळ्याचा साचा दुसऱ्याने; रस त्या साच्यात ओतला तिसऱ्याने; रसाला खिळ्याचा आकार आल्यावर त्याला गुळगुळीत केला चौथ्याने व चकचकीत (Polish)

केला पांचव्याने. श्रमविभागाच्या या पद्धतीमुळे उत्पादन शुद्ध यांत्रिक बनल्याने कारागिराचा त्याच्याशी हार्दिक संबंध उरलाच नाही. उत्पादन-क्रियेत हा बदल झाला, पण तिच्या साधनाशी उत्पादकवर्गाचा असलेला संबंध अजून होता तोच कायम राहिला. म्हणजे उत्पादनक्रिया सामुदायिक झाली तरी भांडवलावरील व उत्पादन केलेल्या वस्तूवरील खाजगी मालकी-हक्क अजून टिकून आहे. यामुळे उत्पादकवर्ग–कामगार व उत्पादनसाधन–भांडवल यांच्यात तीव्र विरोध माजला आहे. यामुळेच आतापर्यंत होत आलेला विकास थांबून शास्त्र व कला यांची वाढ खुंटली. उलट, उत्पादकवर्ग वाढत आहे. त्याच्या सांस्कृतिक जाणिवा व्यक्त होत आहेत. समाजजीवनाची व संस्कृतीची कुचंबणा या कारणामुळेच होत आहे.

हे पाहून आमचे सनातनी जसे भांबावले तसाच अर्थशास्त्रज्ञ मिल्लसुद्धा गांगरला होता. "या सर्व यांत्रिक सुधारणांमुळे एका तरी कामगाराला सुख लाभले आहे का ?" असा त्याने उपहासपूर्ण प्रश्न केला. या प्रश्नाला तितक्याच उपहासाने मार्क्स उत्तर देतो— "Neither is this the purpose of machinery used in a capitalist manner. In common with all other methods of development in the productivity of labour their purpose is to cheapen the price of commodity .. machines are a means for the product of surplus Value."[1] ( भांडवली पद्धतीने वापरल्या जाणाऱ्या यंत्राचे ते ( सुख लाभणे ) प्रयोजनच नाही. कामगारांची उत्पादनक्षमता वाढविण्याच्या इतर पद्धतींप्रमाणे त्यांचे ( यंत्रांचे ) कार्य वस्तूच्या किंमती कमी करणे हे आहे... यंत्रे ही अतिरिक्त मूल्य, म्हणजे नफा निर्माण करण्याची साधने होत. ) भांडवल-शाहीत असली कुचंबणा होण्याचे शास्त्रीय कारण असे आहे : The real application of technical discoveries lags far behind the already possible development of the forces of production and this is attested by a number of bourgeois scientists.[2] ( कामगारांची संख्या

---

1. Capital —Karl Marx.

2. Relations of Science, Technology and Economics–by M. Rubeinstein (Science at Cross Roads.)

ज्या प्रमाणात वाढण्याची खरोखर शक्यता असते ( त्या प्रमाणाशी तुलना करून पाहता ) त्या मानाने तांत्रिक शोधाचा वापर फारच कमी होत असतो. कितीतरी भांडवली शास्त्रज्ञांनी या विधानाला दुजोराच दिलेला आहे. ) अमेरिकेतील हुअर कमिशनने या प्रश्नाची चौकशी करून असे मत दिले आहे, की जर आधुनिक शास्त्रीय शोधाप्रमाणे येथील धंदे चालतील तर कामाचे तास ३/४ हिश्श्याने कमी होऊन शिवाय उत्पादन दुप्पट वाढेल. पण तसे होण्याऐवजी 'नफा नाही' या सबबीवर उत्पादन नष्ट केले जात आहे, तर कोठे या शास्त्रीय शोधांचा उपयोगच केला जात नाही. पहिल्याचे उदाहरण अमेरिका व दुसऱ्या विधानाचे उदाहरण हिंदुस्तान. अमेरिकेत शास्त्रीय शोधांचा उपयोग केला तर वाढलेले उत्पादन नष्ट करावे लागते. कारण किंमती (नफा) कमी होता कामा नये. हिंदुस्थानात त्यांचा उपयोग होत नसल्याने शेती व उद्योगधंदे वाढत नाहीत.* दोहोंचा परिणाम एकच; तो म्हणजे उत्पादकवर्गाचा कोंडमारा ! या सर्व प्रकाराला अमेरिकन लेखक चेस याने, Economics of a mad house — वेड्या घरचा व्यवहार — असे म्हटले आहे. पण भांडवलीशाहीच्या अर्थशास्त्राचा उगम, वाढ व पर्यवसान mad house मध्येच व्हावयाचे हे मार्क्सने पूर्वीच दाखवून दिले आहे.

असे होण्याचे कारण भांडवलशाहीच्या मूलभूत हेतूमध्ये दिसून येते. नफा हा तो हेतू आहे. तो वाढविण्याकरिता प्रथम 'मोकाट स्पर्धा' Free-Competition–सुरू झाली. पण तिच्यामुळे गरजेपेक्षा उत्पादन अधिक झाले. त्यामुळे बाजारभाव मंदावून नफा कमी होऊ लागला. यामुळे उत्पादकवर्गाची गळचेपी अनेक मार्गांनी सुरू झाली. पगारकाट, बेकारी व उपासमारीही वाढली. म्हणून वैज्ञानिक व तांत्रिक प्रगती थांबली. उदाहरणार्थ, रामन यांचा शोध उपयोगात येत नाही. याचे अर्थशास्त्रातले कारण असे आहे, की जेव्हा एखाद्या यंत्राची किंमत आणि त्या यंत्रावर होणाऱ्या उत्पादनाचा खर्च यामध्ये बाजारातील चढाओढ भागवून ठराविक

---

* ( १९३५ साली ब्रिटिश अमदानीतल्या स्थितीला अनुलक्षून हे विधान केलेले होते. स्वातंत्र्योत्तर काळात ही स्थिती बरीचशी बदलली आहे.)

नफा उरावा इतकी बचत राहील, तेव्हाच भांडवलशाही नवीन यंत्राची योजना करील.[1] याचा अर्थ असा, की जेथे मजूरदार अत्यंत स्वस्त तेथे यांत्रिक शोधांचा उपयोग होत नाही व म्हणून वाढ नाही. उदाहरणार्थ, हिंदुस्तानातील गिरण्यातील टाकाऊ यंत्रे, शेतीची जुनाट औते, ही बदलत नाहीत. याचे कारण वर दर्शविलेली उपपत्ती ही होय. साध्या भाषेत बोलावयाचे तर, वाढत्या उत्पादकशक्तीचा समावेश होण्याइतकी भांडवलशाहीची चौकट लांबरुंद नाही व त्यामुळे आजचे अनर्थ माजलेले आहेत. अनर्थाच्या दृक् प्रत्ययापुरते सनातनी व नवमतवादी यांचे मतैक्य आहे. पण अनर्थाची वर दिलेली कारणपरंपरा त्यांना मानवत नाही म्हणून उपाययोजनेतही दृष्टिभेद राहतो. त्यांना त्यांच्या जुनाट धर्मग्रंथात काय लिहिले आहे तेवढेच पाहावयाचे आहे, तर आम्हाला सृष्टीतील दैनंदिन घडामोडी तपासून त्यातून विकासक्रमाचे नियम ठरवायचे आहेत आणि त्याप्रमाणे आयुष्य आखायचे आहे. असल्या लोकांबद्दल गॅलिलियोने पूर्वी काढलेले उद्गार सूचक आहेत. आपला मित्र केपलर यास लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो : We must smile, Kepler, at the great stupidity of these men. They think that philosophy is a kind of book, that truth has to be sought not in the world, not in nature, but in the collation of Texts.

( केपलर, या लोकांच्या महामूर्खपणाची आपण कीवच केली पाहिजे. त्यांना वाटते, तत्त्वज्ञान हा जणू एक प्रकारचा ग्रंथच आहे आणि सत्य हे सृष्टीतून–जीवनातून शोधायचे नसून ते फक्त ग्रंथाच्या पानातून धुंडाळायचे असते. ) [२]

गॅलिलिओकालीन सनातनी आजच्या सनातन्यांचेच पूर्वज ना ! प्राप्त अवस्थेची उपपत्ती कशी लावावी याबद्दल मार्क्स म्हणतो, The prevailing consciousness during these periods has to be

---

1. Relations of Science, Technology and Economics–by M. Rubeinstein.

२. गॅलिलिओने सृष्टी गतिमान असून पदार्थ चैतन्ययुक्त असल्याचा शोध लावला.

explained by referance to the antagonism of material existance, to the existing conflict between the productive forces and the production relationship, i. e. the property relationship.[1]

(या कालखंडातून प्रचलित असलेल्या जाणीवांचा (श्रद्धांचा) उलगडा भौतिक जीवनातील संघर्षाच्या—कामगार व त्यांचे उत्पादन संबंध यातील अनुस्यूत संघर्षाच्या अनुरोधानेच केला पाहिजे.) या ऐतिहासिक उपपत्तीच्या ज्ञानाभावी सांप्रत पेटलेल्या वर्गविग्रहामुळे आमचे मृतपिंड-पूजक सनातनी घाबरून गेले असल्याने ते असा युक्तिवाद करतात : 'ठीक आहे. भांडवलशाहीची चौकट उत्पादकवर्गांना समाविष्ट करण्यासारखी नाही ना ? मग तीत कोंडमारा करून गुदमरण्यापेक्षा मागे परत फिरा कसे ! ज्या समाजपद्धतीत भांडलवशाहीचा अनर्थ नव्हता, तिकडे जाऊ या. 'मागे चला' ही कल्पना अनेक लोक अनेक शब्दांनी व्यक्त करीत आहेत. कोणी म्हणतात, वेदांकडे चला; कोणी म्हणतात, जातिसंस्थेकडे परत चला; कोणी म्हणतात, रामराज्यात चला; आणि आता सरकारही म्हणते, चरक्याकडे चला.[२] मागे पळ काढण्यात या सर्वांची जणू काय शर्यतच लागली आहे ! त्याकरिता काही पक्ष मोठाले फंड उभे करण्याचा विचार करीत आहेत. ही सर्व धावपळ पाहून एक शास्त्रज्ञ म्हणतो, " It is extremely characteristic of the endless contraditions in which modern emperical and natural Science has become involved, that none of the theories of evolution existing in Bourgeois Science is able to maintain itself in the very positions which it was called upon to refute. "[३]

---

1. Critique of Political Economy–Marx.

२. १९३०–३२ च्या भयंकर मंदीत मुंबईच्या सुमारे ३५ गिरण्या बंद पडून (मुंबईप्रमाणे सोलापूर, कानपूर अहमदाबाद वगैरे) हजारो कामगार बेकार झाले. त्यांना उपजीविकेसाठी तेव्हाच्या सरकारने हा उपाय सुचविला होता.

3. The Physical and Biological in the process of organic evolution—by B. Zavadovsky. ( Science at Cross Roads. )

( आधुनिक दृक्प्रत्ययशास्त्र व निसर्गशास्त्र असीम विसंगतीच्या भवचक्रात सापडले आहे याचे मर्मभेदी लक्षण हे, की ज्याचे खन्डन करण्यासाठी म्हणून भांडवली शास्त्रातील उत्क्रांती सिद्धांत मूलतः निर्माण झाले, त्यापैकी एकही सिद्धांत आज आपल्या मूळ भूमिकेला ठामपणे चिकटून राहू शकत नाही. )

चरके व हातमागाचा धंदा ज्या ब्रिटिश भांडवलशाहीने अत्याचार करून नष्ट केला तीच आता त्याचे पुनरुज्जीवन करण्यात मदत करू इच्छित आहे ! याचे कारण एकंदर साम्राज्यशाहीच्या वर्चस्वाखालील सांप्रतच्या जागतिक परिस्थितीत सापडेल. पण तो अर्थशास्त्राचा विषय असल्याने त्याच्या विस्तृत विवेचनात शिरण्याला येथे अवकाश नाही.

या मागे जाण्याचा अर्थ काय ? वेदांपासून जातिसंस्थेपर्यंत कोणती समाजपद्धती होती ? आपण मागेच पाहिले आहे, की हा सर्व सरंजामी पद्धतीचा काल होता. ही पद्धती का व कशी मोडली हेही आपण पाहिले. अर्थात उपयुक्तता नष्ट झालेल्या स्थितीकडे मागे जाणे ऐतिहासिक नियमनाविरुद्ध व म्हणून अशक्य आहे. उत्पादकवर्गांना जेथे भांडवलशाहीची चौकट पुरेनाशी झाली आहे तेथे तिच्यापेक्षाही अरुंद असलेली सरंजामी चौकट कशी पुरणार ? वाढलेल्या लोकसंख्येच्या अधिकाधिक वाढत जाणाऱ्या गरजा जीवनमानाच्या त्या मागस अर्थपद्धती कशा भागवू शकणार ? याकरिता माघार शक्य नाही. माघार म्हणजेच समाजाचा उच्छेद ! म्हणून आजचा विग्रह ज्यामुळे उत्पन्न झाला ते मूळ काढून टाकणे व त्याकरिता ऐतिहासिक भौतिकवादाच्या विकासमार्गाने पुढे जाणे हाच एक क्रमप्राप्त मार्ग उरतो. हा युक्तिवाद बिनतोड असल्याचे काही पंडितांना पटते. यामुळे अपरिवर्तनाची बाजू बदलून ते म्हणू लागतात, होय. काळच फिरला, तेव्हा आपणही बदलले पाहिजे; धर्म हा सापेक्षच आहे; ( त्यांचा शब्द परिवर्तनीयच ) आमची सुधारणेला हरकत नाही; पण ही सुधारणा आपल्या पुरातन धर्म, नीती, संस्कृती यांना धरून करा.

या प्रतिपादनाचा अर्थ काय ? येथवर जे परिक्षण केले त्यावरून चालू धर्म, नीती व संस्कृतीच्या कल्पना खाजगी मालकीहक्कावर उभारलेल्या व त्याचे रक्षण करण्याकरिताच निर्माण केल्या गेलेल्या आहेत, असे आपणाला

दिसून आले आहे. यामुळे या युक्तिवादाचा अर्थ मालकी–हक्काला–भांडवलशाहीला जिवंत ठेवा असाच होतो. पण वस्तुस्थिती तशी आहे काय? इतिहास काय सांगतो? आपण आतापर्यंत काय पाहिले?

प्राप्त अनर्थाचे येथवर विवरण केले त्यात असे दिसून आले, की उत्पादनाचे स्वरूप सामाजिक बनले असता त्याच्या साधनांवरील मालकीहक्क अद्याप खाजगी स्वरूपाचाच राहिला असल्यामुळे उत्पादकवर्ग व भांडवल यांचा विग्रह तीव्र झाला आहे. याच विसंगतीमुळे शास्त्रांची कुचंबणा होत आहे. याचा अर्थ, भांडवलशाही पद्धती आर्थिकदृष्ट्या अनुपयुक्त व म्हणूनच विकासविरोधी बनली आहे. पण उत्पादकवर्गाच्या विकासाला विरोधक होणारी आर्थिक पद्धती नष्ट होते हा प्रत्यक्षानुभवाचा ऐतिहासिक सिद्धांत आहे व प्राप्त वर्गविग्रहात उत्पादकवर्ग प्रागतिक असल्यामुळे विजयी होणार, हा त्याचा निष्कर्ष आहे. हा वर्ग स्वाभाविक गुणधर्माने खाजगी मालमत्तेच्या तत्त्वाला विरोधी असल्यामुळे त्याच्या विजयात खाजगी मालमत्तेच्या हक्काचा व त्यावर उभारलेल्या धर्म, संस्कृती व शासनपद्धतीच्या मनोऱ्यांचा उच्छेद आहे. त्यांच्याऐवजी समाईक व सामुदायिक जीवनप्रणालिका निर्माण होणार आहे. सर्व मानवजातीला स्पर्शणारी एक भव्योदात्त संस्कृती विकसित होणार आहे.

झालेल्या विवेचनाच्या पसाऱ्यातून सूत्ररूपाने निष्कर्ष काढावयाचा तो असा : पूर्णांश (संपूर्ण) घटक म्हणूनच समाज जगतो व वाढतो. ही वाढ व अस्तित्व टिकविण्याकरिता समाजाने उत्पादनाची वाढ केली पाहिजे. उत्पादनक्रियेत लोक विशिष्ट प्रकारचे अन्योन्यसंबंध निर्माण करतात. हे संबंध व्यक्तीचे हेतू व भावना यापासून स्वतंत्र असतात. भौतिक उत्पादकशक्तींच्या (कामगारवर्गाच्या) वाढीशी हे संबंध प्रत्येक ऐतिहासिक अवस्थेत निगडीत असतात.

उत्पादकशक्तींच्या (कामगारांच्या श्रमाच्या) गोळाबेरजेतून आर्थिक घटक निर्माण होतो. (समाजाचा) खरा मूलभूत पाया हाच असून त्यावर शास्त्रविषयक व शासनविषयक मनोरे उभारले जातात.

"अर्थ एव प्रधानः" या चाणक्याच्या सूत्राचा अर्थ हाच आहे.

सामाजिक विचारसंपदेचे (Idealogy) प्रकारही या मूलभूत पायाशी जुळणारे असतात.

विचारसंपदेवरून मानवी जीविताची पद्धती ठरत नाही. उलट सामाजिक जीवनपद्धतीनुरूप विचारसंपदा निर्माण होत असते. वाढीच्या विकासाच्या विशिष्ट प्रकारच्या अवस्थेत समाजातील उत्पादकवर्गाचा त्यांच्या उत्पादन-साधनांशी म्हणजे मालकीहक्काच्या प्रकाराशी ( त्यातच त्याची वाढ झाली असताना ) विरोध येतो.

यामुळे उत्पादनाचे साधनरूप असलेले हे संबंध उत्पादकवर्गाच्या प्रगतीला बंधनकारक-जाचक बनतात. असे झाले, की सामाजिक परिवर्तनाचा काळ येतो. यात पूर्वीचा मूलभूत पाया बदलून जातो व त्यामुळे त्या पायावर उभारलेले उत्तुंग मनोरेही बदलून जातात. 'यो भुंक्ते स्तेन एव सः' या पूर्वीच्या तत्त्वाऐवजी 'स्वतःच्या उपभोगासाठी अधिकाधिक साधन संपत्तीचा संग्रह' यामुळेच ही प्रणाली रूढ होते.

म्हणून कोणत्याही घटनेची-विचारसरणीची उपपत्ती भौतिक जीवितातील संघर्षाच्या म्हणजे अंतर्विरोधाच्या अनुरोधाने, अर्थात उत्पादकवर्ग व उत्पादनसंबंध यातील प्रस्तुत विरोधाच्या अनुरोधाने लाविली पाहिजे.[1]

ऐतिहासिक भौतिक ( विकास ) वादाच्या या तत्त्वानुसार सामाजिक घटना व घडामोडी यांचे परीक्षण करीत शास्त्रीयदृष्ट्या, भांडवलशाही समाजपद्धती निरुपयोगी ठरल्याने ती नष्ट होणार व उत्पादकवर्गाच्या विकासाला अनुरूप अशी सामुदायिक समाजपद्धती निर्माण होणार, हा निष्कर्ष सिद्ध झाला. या ऐतिहासिक विहित कार्याचा पुरस्कार करील तोच खरा व शास्त्रशुद्ध नवमतवाद होय. तो प्रस्थापित झाल्याने विकासाच्या त्यापुढील अवस्थेत विद्यमान समाजातील वर्गविरोध नष्ट होऊन सर्व समाज समपातळीवर आल्याने सामाजिक हेतू व कृती यात विरोध राहणार नाही. खाजगी मालमत्तेच्या पद्धतीचे उच्चाटन झाल्याने समाजव्यवहारात स्पर्धेऐवजी सहकार्य उत्पन्न होऊन उत्पादकशक्ती व गरजा यांचा मेळ बसेल व सर्व सामाजिक व्यवहार आखीव पद्धतीने चालू लागेल. यामुळे आजची भगभग

---

1. Marxist Theory of Historical Process–Science at Cross Roads.

नष्ट होऊन सुख, संतोष आणि समृद्धी नांदू लागतील. त्यामुळे प्रभावी विचार-संपदा निर्माण होईल व त्यावर उभारलेली संस्कृती उत्तुंग व दैदीप्यमान, सर्वंकश व सत्यशः मानवी बनेल आणि पुढील विकासाची दिशा त्या विचार-संपदेच्या प्रकाशात दिसू लागेल.

× × ×

## पुरवणी :

भारतीय समाज आता ज्या अवस्थेला येऊन पोचला आहे व समृद्धीच्या सावलीखाली भूक, भगभग व अशाश्वती यांच्या गर्तेत अडकला आहे तिच्यातून अधिक प्रगत अवस्थेकडे नेणारा नवा मार्ग कोणता याच्या शोधात आपण समाजवादाशी येऊन पोचलो. रुतलेल्या गाड्याला गती मिळून त्याला प्रगतिपथावर आणील तोच खरा नवमतवाद या प्रमेयाचा मुमुक्ष-दंड हाती घेऊन समाजेतिहासाच्या चाकोरीतून 'पुढती वाट पुसत पुसत' आपण 'समाजवाद' या निष्कर्षाप्रत येऊन पोचलो. प्रस्तुत प्रबंधाचे मर्यादित प्रयोजन इथे संपले.

समाजवाद हा शब्द आपल्या देशात आता चांगलाच रुळलेला आहे. आज त्यात अद्भुत किंवा अतर्क्य काहीच राहिलेले नाही. पस्तीस–चाळीस वर्षांपूर्वी त्यात कांहीना नाविन्याचे आकर्षण होते. पण मीरत केसनंतर ते आकर्षण ओसरले व मग बहुतेक थरांतून त्याला कडवा विरोध सुरू झाला. कॉंग्रेस, हिंदुसभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, समाज समता संघ, मुस्लीम लीग, कॅथालिक पंथ व इतर चिल्लरमुलर–सर्वांचे मत एक : एका शापित भूमीतला हा 'बेढंगी' माल ! देव नाही, धर्म नाही, नीति नाही, संस्कृति नाही, पावित्र्य नाही, की साधन शुचिता नाही; सुखलंपट व भोगवादी अशा या आसुरी संपदेच्या काम्यमोहापासून समाजाला भेडसावून दूर ठेवण्याचे धीमंत व बलवंत अटोकाट प्रयत्न करीत होते.

पण याच काळात मानीव श्रद्धेयांवर आक्रमणही होत होते. डॉ. मुंजे ब्राह्मणांना मटन खायला शिकवीत होते. (सर्वसामान्य शहरी ब्राह्मण स्त्रीपुरूष या विद्येत आता बरेच पारंगत झाले आहेत !) आंतरजातीय विवाहांनाही जोराची चालना याच काळात मिळाली. धर्मसंज्ञा व संकेत अनादिसिद्ध नसून ते परिवर्तनीय आहेत हे प्रोटेस्टंटी मत तर आता सर्वमान्य

होऊन चुकले आहे. ब्रह्मदेवाचे प्रजोत्पादनांचे अखंड व्रत तांत्रिक उपकरणाचा कोलदांडा घालून रोखून धरण्याचा प्रचारही याच काळात झाला. एकीकडे नीतिशास्त्राचा गंभीर विचार होत होता, तर दुसरीकडे मूलग्राही तत्त्वचिंतनाचा मगदूर नसलेले कोणी लैंगिक स्वैराचाराचा पुरस्कार करीत होते. एकूण गृहित मानल्या गेलेल्या मूल्यांच्या मंथनाचा तो काळ होता. चित्र आणि विचित्र असे विचार समाजापुढे येत होते.

कमी अधिक प्रमाणात हे सर्वच विचार ‘ नवमतवाद ’ या अघळपघळ नावाखाली खपत होते. अशावेळीं असल्या विचारांची बेगड धुवून काढून ‘ समाजवाद हाच आजचा खरा नवमतवाद ’ हे मत प्रतिपादन करण्यासाठी हा प्रबंध लिहिला गेला. भांडवली अर्थ जीवनाच्या विसंगती चक्रातून एका प्रगत अवस्थेकडे जाण्याचा मार्ग दाखविणे एवढेच मर्यादित प्रयोजन या प्रबंधाचे होते.

समाजवादाच्या कडव्या विरोधाचा गदारोळ चालू असतानाच भारताच्या आर्थिक व राजकीय जीवनात उल्कापाती घडामोड चालू होती, तर रशियात समाजवाद भक्कमपणाने पाय रोवून प्रगतीची एकेक पायरी योजनाबद्ध रीतीने ओलांडीत होता. केवळ बारा पंधरा वर्षाच्या काळातच त्याने इतके प्रचंड भौतिक व नैतिक सामर्थ्य प्राप्त केले की फ्रान्सपासून पोलंड, बल्गेरियापर्यंतचा सारा युरोपखंड पादाक्रांत करून तेथल्या साधन-संपत्ती नी मनुष्यबळासह चालून आलेल्या हिटलरचा निःपात करून बर्लिन-पर्यंतचा सारा पूर्व युरोप त्याने मुक्त केला. हा मुक्त प्रदेश समाजवादाचा ध्वजधारी झाला. चीनही लगोलग भांडवली पाशातून मुक्त झाला. केवळ चाळीस वर्षांतली भूतलावरची ही सिद्धी पाहिली तर ती थक्क करून सोडणारी होतीच. पण अलीकडे भुवर्लोकी – अंतरीक्षात भराऱ्या मारून त्याने अकल्पित विक्रम केले. मुक्त मानवाच्या कल्पकता व प्रेरकता यांच्या या भव्य आविष्काराने तर आता अर्धेअधिक जग समाजवादाकडे जोराने आकृष्ट झाले आहे.

या सर्व परिस्थितीमुळे समाजवादाला उघड विरोध असा भारतात आता कोणी करीत नाही. किंबहुना काँग्रेसह अनेक पक्षात आम्हीच खरे समाजवादी या अट्टाहासाचा दमछाट कंठशोष चाललेला आहे. हजारो

ग्रा. क्र. १६५८०

वर्षांच्या घडामोडींनी संस्कारित केलेले भारतीय मन असे अजब आहे, की ज्याला ते प्रारंभी कसून विरोध करते त्यालाच ते पुढे आत्मसात करीत नवनवा समन्वय साधीत असते. ऋग्वेदाच्या प्रारंभकालापासून हीच समन्वय-क्रिया सतत व संतत चालू असलेली दिसते.

हा सर्व गदारोळ पाहून आजच्या जिज्ञासू तरुणाला अचंबा हा वाटतो की जर कॉंग्रेस, प्रजासमाजवादी, संयुक्त समाजवादी, शे. का. पक्ष, धाकटी व मोठी पाती मिळून कम्युनिस्ट पक्ष आणि याशिवायचे आणखीही कोणी फुटकळ गट व व्यक्ती या सर्वांचे इप्सित जर समाजवाद हे एकच असेल, तर आठ भैय्ये नऊ चुलीसारखी त्यांची अवस्था कां? एकोप्याऐवजी एकमेकांच्या उरावर बसण्याची सुंदोपसुंदी वृत्ती कां?

आणखीही एक प्रश्न त्याला भेडसावतो. तो म्हणजे या निरनिराळ्या अड्ड्यांवर एकाच समाजवादाची फलितें अशी निरनिराळी कां? साखर जर गोड असेल तर कोणच्याही दुकानातून ती घेतली तरी गोडच लागायला हवी. पण इथे पहावे तर कॉंग्रेसच्या समाजवादात संपत्तीचे विलक्षण केंद्रीकरण होते आहे व त्याच्याशेजारी भूक व दुर्भिक्ष्य यांचा कोलाहल माजलेला दिसतो आहे. उद्योगधंदे वाढत आहेत व बेकारीही वाढते आहे. दुसऱ्या फलकाखाली पाहिले तर जनता प्रेमापेक्षा दुसऱ्यांच्या द्वेषाचेच चित्कार उठवाहेत. तिसऱ्या ठिकाणी बाकीच्या सर्वांबद्दल तुच्छता आणि संप नी बंदचा अतिरिक्त पुरस्कार याचेच घोष घुमत आहेत. कम्युनिस्टांना घरच्या-पेक्षा बाजारच्या भाकरीची जास्त पोटतिडीक!

या सर्व कोलाहलात जनता कुठे आहे? वैफल्यात सापडून व निष्क्रीय बनून ती मातीच्या गोळ्यासारखी थिजून तरी राहिली आहे किंवा मटका, जुगार, हातभट्टी, लाचलुचपत व अफरातफर, चोरीमारी किंवा चोरट्या व्यापारातली दलाली यात गुरफटली आहे. नव स्वतंत्र भारताच्या ध्वजाखाली कसला हा चोरबाजार! आचार-विचार व्यक्तिस्वातंत्र्याचा आविष्कार तो हाच का? हा तर भांडवली अराजकाचा अविष्कार झाला! आज भारताला जे सर्वतोपरी सहाय्य करीत आहेत त्या हंगेरी, पूर्वजर्मनी, झेकोस्लोव्हाकिया, रुमेनिया, रशिया यांनी असल्याच वायफळाच्या मळयातून वाटचाल केली असेल का?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाण. स्थलांत
अनुक्रम ८५७८८ दि. ... विभाग

या गोंधळलेल्या अवस्थेतून जिज्ञासू सावरतो व अधिक जागृत बनून विचार करू लागतो, तेव्हा त्याला शंका ही येते, की या लोकांच्या समाजवादाच्या व्याख्येत तर काही गोंधळ नाही ना? त्याची शंका खरी आहे. उक्ती व कृती यांत तफावत पडली की फलिते अशी नासकीच येणार!

समाजवादाचा असा विचका होतो आहे याचे कारण उत्क्रान्तिशास्त्राच्या ऐतिहासिक प्रमेयाबद्दलची अनास्था किंवा अनभिज्ञता हे आहे ही अनास्था दूर व्हावी व ऐतिहासिक उत्क्रान्तिक्रमाचा सापेक्षतेने परिचय व्हावा हाच या प्रबंधाचा मुख्य हेतू आहे. या शास्त्राला जे ऐतिहासिक भौतिकवाद हे नाव आहे त्या शास्त्राची स्थूलरूपाने मांडणी या प्रबंधात केलेली आहे. या शास्त्राच्या परिचयाने परिस्थितीची गती व तिच्या गर्भात निर्माण होणारी विसंगती यांचे स्वरूप स्पष्ट होईल, ते स्पष्ट होण्याची गमकें कळून येतील आणि त्यावरून पुढच्या योजनेची दिशा सापडेल.

या अनुरोधाने ' समाजवाद ' ही दिशा आपल्याला सापडली. तर मग आता ऐतिहासिक भौतिकवादाचे कार्य संपले का? उत्क्रांतीत ' इथे थांबावे–पुढे जाऊ नये ' असा काही दंडक असतो का?

अर्थात नाही. उत्क्रांतीचे द्वंद्वचक्र कल्पान्तापर्यंत चालू राहणार आहे. कारण ते सृष्टितत्त्वाशी निगडीत आहे. निरनिराळ्या कालखंडात तिचे स्वरूप व कार्य यात बदल होत राहील

भांडवलशाही जाऊन समाजवाद आला, म्हणजे क्रमशः वर्गविग्रह नष्ट होऊन समाज एकसंध बनेल व एकाच ध्येयाने तो प्रेरित झालेला असेल. वर्ग, जाती, वैयक्तिक हितसंबंध व खाजगी मालकी हक्क नष्ट झाल्याने सामाजिक प्रेरणा वाढीला लागेल आणि नवेनवे शोध व सिद्धी हस्तगत होतील. खाजगी हक्काखाली गडप होणारी संपत्ती समाजविकासासाठी खुली झाली आणि उत्पादन व बाजार समाजाच्या नियंत्रणाखाली आलीं म्हणजे व्यक्तीची खरेदीशक्ती व बाजारभाव यात तफावत राहणार नाही. यामुळे चलन फुगावा व शाश्वत संपत्तीचा लय यांना वाव राहणार नाही. प्रत्येक व्यक्ती मिळवती झाल्याने सामाजिक क्रयविक्रय शक्ती अनेक पटींनी वाढून उत्पादनाला आणि तंत्र व विज्ञानाला बहर येईल. मुकेकंगाल, अनाथ मुले, शिक्षणवंचित मानव राहणार नाही. शिक्षण व आर्थिक नी तांत्रिक

साधने ही वाढली म्हणजे निसर्गाची गूढ रहस्ये उकलण्याची अहमहमिका लागून व संशोधन परिपूर्ण बनून ठराविक काळात ठराविक कार्य घडू लागतील.

पण विकासाच्या या विलक्षण गतिचक्रात त्याच्या नैसर्गिक क्रमामुळेच जीवन अधिकाधिक बांधील व नियंत्रित होत जाऊन नियंत्यांच्या हातात सत्तेचे अमाप केंद्रीभवन घडू लागेल, हेहि तितकेंच खरे. त्यामुळे लोकनियुक्त का होईना, एक नवी सर्वंकष समाजवादी नोकरशाही निर्माण होऊन शासन-सत्ता अति जडजंबाल बनू लागेल. लेनिनना याची कल्पना आहे व त्याविरुद्ध त्यानी इषाराही देऊन ठेवलेला आहे.

असे झाले तरी भूक, दुर्भिक्ष्य, बेकारी व वर्गविग्रह नष्ट झाल्याने जीवनाला शाश्वती लाभेल हे निश्चित आहे. पोटाची भूक ही अपरिहार्यपणे अत्यंत महत्त्वाची प्राथमिक गरज असली तरी गुराप्रमाणे मानवाची ती एकमेव भूक नव्हे; किंबहुना सुसंस्कृत व्यक्ति प्रसंगी पोट मारून सुद्धा मनाची भूक भागविण्याच्या धडपडीत असते. अद्भुत व अगम्य असें जे जे, ते ते जाणण्याची ही भूक आहे. म्हणूनच प्राथमिक गरजा पूर्णपणे भागण्याइतकी सुबत्ता झाल्यावर तेथपर्यंत सुप्तावस्थेत दबून राहिलेली किंवा अनुकूलतेच्या अभावी कुंठित होऊन राहिलेली मानवी मनाची भूक जागी होऊन चेतून उठेल. ती नवे छंद शोधील, आत्मप्रकटीकरणाचे नवनवे अनु बंध हुडकू लागेल. अति संयोजित व नियंत्रित समाजव्यवस्थेत सामाजिक कल्पकता व कर्तबगारीला भरपूर वाव मिळत असला तरी अहर्निश नव्या उन्मेषाने नटणारी व्यक्तिप्रेरणा त्यात यांत्रिक बनून कुंठीत होऊ लागली तर तिचा शासनयंत्रणेशी संघर्ष येईल. पण त्याला न जुमानता अधिकाधिक भव्योदात्त सिद्धी हस्तगत करू पहाणारी ही व्यक्तिप्रेरणा आत्मप्रकटनाचे आणि त्याच्या पूर्णतेचे मार्ग शोधू लागेल. इथे हे लक्षात ठेवले पाहिजे, की ही व्यक्तिप्रेरणा आजच्यासारखी स्वहितसाधक असणार नसून सामाजिक जीवनाच्या आविष्कारात वडण झालेली ती विश्वात्मस्वरूपी असेल. म्हणून व्यक्तीविरुद्ध समष्टी असे तिचे समीकरण असणार नाही. तिची झेप व्यक्ति-हित साधनेची नसून व्यापक समष्टीस्वरूपाचीच असेल. विश्वातील गूढ रहस्ये हुडकून काढणे, चराचराच्या अद्भुततेचा उकल करणे, अतींद्रिय मनाचा ठाव घेणे, आजपर्यंतच्या उपनिषदादि सर्व तत्त्वज्ञानांनी ‘ नेतिनेति ’ म्हणून

जिथे हात टेकले त्या पलीकडचे अगम्य आवाक्यात आणणे, सूर्यमंडळाचा भेद करू धजणे व ब्रह्म तत्त्व म्हणून जे काही अगमागम आहे ते भौतिक जीवनात तंत्र व विज्ञानशास्त्राच्या मदतीने साकार करू पाहणे या मानवी-पूर्णत्वाच्या दिशेने विरोधविकासाची गती वरच्या वरच्या श्रेणीने विकसित होत जाईल.

तिच्या या अफाट संसाराच्या क्रमात केव्हातरी शासनसंस्था लुप्त होऊन नव्या विमुक्त जीवनानंदाची उभारणी होईल.

फार फार दूरवरच्या भविष्यकाळाचे हे कल्पनागम्य चित्र आहे, हे खरे; पण अथांग मानवी प्रेरणेच्या भौतिक विकासक्रमावर ते आधारलेले असल्याने निवळ कल्पनारम्यतेचे द्योतक म्हटले जाऊ नये.

ज्या दिवशी मानवाने पृथ्वीचे कवच भेदून अंतरिक्षात झेप घेतली व चंद्रलोकावरील मातीचा वास घेतला त्याच दिवशी या कल्पनारम्यतेच्या चित्राच्या पहिल्या रेखा चितारल्या गेल्या.

× × ×

# परिशिष्ट

## – १ –

[ **‘नवमतवाद’** या पुस्तकावर **‘वसुंधरा’** साप्ताहिकात ता. ८–६–३५ रोजी **श्री. अनंत काणेकर** यानी स्वतःच्या सहीने लिहिलेले विस्तृत परीक्षण. ]

आजकाल ‘नवमतवाद’ या शब्दाची निरनिराळ्या बाजूनी कुतरओढ चालली असताना आणि डोक्यावर टोपी ठेवल्याशिवाय वावरणाऱ्यापासून तो संतति-नियमनाचा प्रचार करणाऱ्यापर्यंत वाटेल ते आणि वाटेल तसे लिहिणारा तो नवमतवादी, अशी नवमतवाद्यांची उठला सुटला तो लागेल ती व्याख्या करीत असताना, नवमतवाद्यांची तात्त्विक भूमिका ठासून व स्पष्ट भाषेत मांडणारे श्री. राजशेखर यांचे ‘नवमतवाद’ हे चिमुकले पुस्तक अत्यंत योग्य वेळी प्रसिद्ध झाले आहे, यात शंका नाही. अर्थात ‘राजशेखर’ यांच्या या चिमुकल्या पुस्तकात प्रतिपादन केलेले क्रांतिवादी नवमतवादाचे प्रभावी तत्त्वज्ञान जाणूनबुजून स्वीकारून साहित्य क्षेत्रात लेखणी चालविणारे लेखक श्री. राजशेखरांखेरीज तीन किंवा चारापेक्षा अधिक असतील, असे मला तरी वाटत नाही.

मी वर जे म्हटले आहे, की हे पुस्तक अत्यंत योग्य वेळी प्रसिद्ध झाले आहे त्याला अनेक कारणे आहेत. ‘नवमतवाद’ हा शब्द इतका लवचिक आहे, की त्याचा वाटेल त्याने वाटेल तसा उपयोग केला तर खरोखरच मी तरी त्या माणसाला दोष देणार नाही. स्वतःला नवीन असे वाटणारे मत प्रतिपादन करणारा हा प्रत्येकाला नवमतवादीच वाटणार. मुलींची आठव्या वर्षी लग्ने व्हावी असे म्हणणाऱ्या कर्मठ शास्त्र्याच्या दृष्टीने पंधराव्या वर्षी मुलींची लग्ने व्हावी, असे म्हणणारा शास्त्री हा नवमतवादी; या नवमतवादी शास्त्र्याच्या दृष्टीने हिंदू मिश्रविवाहाला विरोध न करणारा हिंदूसभावाला हा नवमतवादी, अहिंदू मुलीशी मिश्रविवाह करणारा या हिंदूसभावाल्यांच्या

दृष्टीने नवमतवादी; आणि विवाहसंस्थेच्या विरुद्ध लिहिणारा या नवमतवाद्यांच्याही दृष्टीने नवमतवादी! मतामतांचा असा गलबला माजलेला असल्यामुळे प्रत्येक नवमतवाद्याने आपल्या तत्त्वज्ञानाचे स्पष्ट व असंदिग्ध भाषेत, विवेचन करणे जरूर आहे. प्रस्तुत परीक्षणकर्त्याने नवमतवादाच्या आपल्या व्याख्येचे छोटेसे विवेचन कोल्हापूर येथील 'सत्यवादी' पत्राच्या 'बुवाबाजी खास अंकात' 'नवमतवादी बुवा!' या लेखात केले असून, ऐतिहासिक अर्थ-वादाच्या ( Historical Materialism ) दृष्टीने समाजशास्त्रीय व अर्थशास्त्रीय सिद्धांताकडे पाहून राजकीय, तद्वतच सामाजिक क्रांतीच्या आवश्यकतेचे प्रतिपादन करणारा क्रांतिवादी लेखक म्हणजेच नवमतवादी लेखक, अशी नवमतवाद्यांची व्याख्या केली आहे. याच तत्त्वज्ञानाचे अधिक विस्तृत व सोपपत्तिक विवेचन श्री. राजशेखर यांनी सदर पुस्तकात केले आहे. नवमतवादी म्हणजे एवंगुणविशिष्ट क्रांतिवादी लेखक अशी व्याख्या जर साहित्य क्षेत्रात रूढ होणार नसेल, आणि पशुवत स्वैराचाराच्या किंवा 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत्' असल्या चार्वाकप्रणीत जडवादाच्या प्रचारकापासून तो तहत कमरेचे सोडून डोक्याला बांधणाऱ्या उल्लूभाई मशालजीपर्यंत वाटेल त्या लेखकाला 'नवमतवादी' ही संज्ञा लावली जाणार असेल, तर श्री. राजशेखरादि आमच्यासारख्या बऱ्या वाईट लेखकांनी स्वतःला अतःपर नवमतवादी न म्हणविता फक्त 'क्रांतिवादी' असेच म्हणावे, असे मला वाटते.

या क्रांतिवादी लेखकांचे म्हणणे तरी काय, क्रांती म्हणजे काय, ऐतिहासिक भौतिकतावाद म्हणजे काय आणि या ऐतिहासिक भौतिकतावादाच्या दृष्टीने क्रांतिवादी लेखक धार्मिक, नैतिक, लैंगिक किंवा इतर सामाजिक बाबतीत जी मते तावातावाने प्रतिपादन करतात, ती केवळ विचित्र आणि नवीन आहेत म्हणून लोकप्रसिध्दीकरिता ते सांगत सुटतात, की समाजाचे काहीही होवो, काही व्यक्तींना स्वातंत्र्य मिळून त्यांची चैन होईल म्हणून त्यांचा ते प्रसार करतात, की समाजाच्या धारणेकरताच, समाजाच्या सामुदायिक कल्याणाकरताच ते या मतांचे प्रतिपादन करतात, इत्यादी अनेक प्रश्नांचा थोडक्यात पण उद्बोधक ऊहापोह या लहानशा पुस्तकात श्री. राजशेखर यांनी केला आहे.

'हिंदूंचे समाजरचनाशास्त्र' या पुस्तकाचे कर्ते श्री. गो. म. जोशी यांच्या आव्हानाला उत्तर म्हणून, नवमतवादाची तात्त्विक भूमिका स्पष्टपणे मांडणारे हे पुस्तक श्री. राजशेखर यांनी लिहिले आहे. माझ्या मते श्री. जोशी यांना कसल्याच प्रकारचे उत्तर द्यावयाची जरूर नाही. कारण चार पाच जुन्यापुराण्या आणि नामशेष झालेल्या अमेरिकन, जर्मन इत्यादि पंडितांचे म्हणजे अहिंदू ग्रंथकारांचे आधार पुढे करून हिंदू संस्कृतीची उज्ज्वलता आणि अहिंदू संस्कृतीची क्षणभंगुरता सिद्ध करू पाहणाऱ्या श्री. जोशांना जर उत्तर द्यावयाचे असेल, तर मुंबईतील पुस्तकांचे सुप्रसिद्ध व्यापारी मि. तारापोरवाला यांच्या पुस्तकांचे गठ्ठे बोरीबंदर स्टेशनवरून आपल्या डोक्यावर वाहून आणणाऱ्या हमालाच्याही अनेक प्रश्नांना श्री. राजशेखर यांना उत्तरे द्यावी लागतील!

श्री. जोशी आणि त्यांचे पुस्तकांचे गठ्ठे बाजूला ठेवून प्रामाणिक व विद्वान सनातन्यांच्या आक्षेपांना उत्तर देताना मात्र श्री. राजशेखर यांनी अत्यंत समर्पक व पटणारी उदाहरणे दिली आहेत. उदाहरणार्थ पृष्ठ १३ वर लेखक म्हणतात,

"परिस्थितीसापेक्ष अशी वहिवाटीपेक्षा नवीन कल्पना पुढे आली की सनातनी तिच्यावर घुरकू लागतात. यामुळे समाज व संस्कृती, धर्म व नीती रसातळाला जाणार म्हणून हाकाटी करतात; आणि **तरीही नवागत कल्पनेपुढे ते मान वाकवितात**, सतीच्या चालीला बंदी, बालविवाहप्रतिबंध, संमतिवयाचा कायदा हे याचे अगदी ताजे पुरावे होत. यावरून दोन कल्पना सुचतात. एक अशी की, **सनातन्यांची ओरड असत्य व लबाडीची असावी, किंवा आपल्या मताप्रमाणे आचरण करण्याचे त्यांच्यात धैर्य नसावे.** यात काय खरे ते त्यांनीच ठरवावे. पण इतिहासाचा दंडक मात्र असा आहे, की तत्त्व व कृती, विचार व आचार यांचा विरोध होऊ लागला की, तो समाज, ती संस्कृती नष्ट झाल्यावाचून राहत नाही..." इतिहास म्हणजे प्रतिभावान विभूतींच्या पराक्रमांची नोंद, असे प्रतिपादणाऱ्यांना लेखक उत्तर देतात,

"...या व्याख्येने मानीव थोर विभूतींच्या भावना व कृती यांच्या मागच्या सामाजिक घडामोडी अर्थशून्यच ठरणार......शिवाजीपेक्षा

काकणभर जास्त पराक्रमी राणा प्रतापाला संख्याबलाभावी अरवलीच्या डोंगरात लपत छपत आयुष्य का कंठावे लागले, व शिवाजीच्या मागे हजारो मावळे भूरभूर का धावत सुटले ऽ ... ज्या महाराष्ट्राने शिवाजीच्या पाठीशी आपल्या क्षात्रतेजाची दैदिप्यमान वलये निर्माण केली त्याच महाराष्ट्राने १८५७ चा पुढारी नानासाहेब पेशवे याला का साहाय्य केले नाही ? त्याच्या हाकेला ' ओ ' देऊन समोर समशेर उपसून बाहेर पडणारे किती मावळे निघाले ? १८५७ च्या बंडात यच्चावत व्यापारी वर्गाने इंग्रजांनाच का साहाय्य केले ?...असल्या अत्यंत महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांची उपपत्तीच लागत नाहीशी होते, व नवमतवाद्यांना म्हणजेच क्रांतिवाद्यांना विरोध करणाऱ्या सनातन्यांचे व स्वतःला सुधारक म्हणविणाऱ्या पांढरपेशा विद्वानांचे इतिहासशास्त्र कुंठित होते !...ही अनवस्था मार्क्सच्या उपपत्तीने टळते. ही उपपत्ती म्हणजे घटनाभूत इतिहासकाली एकंदर समाजाची भौतिक स्थिती काय होती...."

मातृत्व हे स्वयंसिद्ध सत्य असून, पितृत्व ही तर्काने सिद्ध होणारी गोष्ट आहे, हे निर्विवाद शास्त्रीय सत्य सरळपणे सांगणाऱ्या क्रांतिवाद्यांवर तो पशुवत स्वैराचाराचा प्रचार करतो असा धादांत खोटा आरोप करून, जणू काय क्रांतिवादी लेखकाने स्वतःच्याच पितृत्वाची शंका घेतली आहे असा समज करून घेऊन स्वतःच्या पितृत्वाची तरफदारी करण्याच्या आवेशाने क्रांतिवादी लेखकांविषयी वाटेल ते बरळणाऱ्या सुधारणावादी पांढरपेशा विद्वानांना लेखकाने दिलेली पुढील माहिती फार उपयोगी पडेल असे मला वाटते. श्री. राजशेखर म्हणतात, " ...... एके काळी विवाहसंस्था अशी नव्हतीच; पण पुढे विवाह घडू लागले ते बहीण व भाऊ, आई व मुलगा, बाप व लेक यांच्यात व त्यानंतर अगदी जवळच्या नातेवाईकात होत असत. यमी ही बहीण यम या भावाला आपली कामेच्छा तृप्त करावयाला सांगते, अशी आमच्या ऋग्वेदात कथा आहे...... नवऱ्याने राजद्रोह केला तर त्याला टाकून दुसरा करावा, हा कौटिल्याचा दंडक वाचून आजचे राजकीय चळवळे खास घाबरतील...... पृष्ठ २७-२८ "

क्रांतिवादी नवमतवाद्यांच्या दृष्टीने अत्यंत जरूरीची व उपयुक्त अशी ही कामगिरी केल्याबद्दल श्री. राजशेखर यांचे अभिनंदन करून हे परीक्षण संपविण्यापूर्वी दोन गोष्टींचा उल्लेख करणे जरूर आहे असे मला वाटते.

नवमतवाद्यांवर नेहमी असा आरोप करण्यात येतो, की स्त्री स्वातंत्र्याच्या आणि लैंगिक स्वातंत्र्याच्या तुम्ही मोठमोठ्या गप्पा करता, मग राजकीय स्वातंत्र्याची घोषणा तुम्ही तितक्याच जोराने का करीत नाही? याला आमचे, म्हणजे क्रांतिवादी नवमतवाद्यांचे हेच उत्तर आहे, की मूठमूठ मीठ पळवून तुरुंगात जाऊन घामाघूम होणे, आणि परत आल्यावर असेंब्लीत जाऊन मानाच्या जागा पटकावण्याचा प्रयत्न करणे, म्हणजेच राजकीय स्वातंत्र्याची चळवळ, असे आम्हाला वाटत नाही. आमची स्वातंत्र्याची जी कल्पना आहे ती म्हणजे राजकीय क्रांती करून, आर्थिक, सामाजिक, लैंगिक समता स्थापन करणे. त्या स्वातंत्र्याच्या तत्त्वांचा प्रसार, आमच्यापैकी जे लेखक आहेत ते प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लिखाणाने, आणि जे कार्यकर्ते आहेत, ते कायदेशीर आणि बेकायदेशीर मार्गाने करीतच आहेत.

दुसरा एक आरोप असा करण्यात येतो, की रशियातल्या क्रांतिवाद्यांची तुम्ही उदाहरणे देता पण त्यांच्या इतका स्वार्थत्याग व त्यांच्याइतके हाल तुम्ही कुठे सोसले आहेत? याला उत्तर असे, की हाल सोसणे आणि आपल्या त्या हालांचे प्रदर्शन मांडणे हा आमचा उद्देश नव्हता व नाही. ध्येयाकरिता हाल सोसण्याचा प्रसंग आला असता आम्ही कमकुवत ठरलो, तर वरील आरोप आमच्यावर करता येईल. तोपर्यंत करता येणार नाही. आणि दुसरे असे, की रशियन क्रांतिवाद्यांनी नानातऱ्हेचे छळ आणि यातना सोसल्या हे खरे आहे. पण निर्बुद्ध टीकाकारांच्या लांबलचक टीका वाचून पचवून टाकणारे आम्ही अधिक सहनशील नाही काय?

# —२—

[ नागपूरच्या ‘ महाराष्ट्र ’ पत्राने **साहित्य समालोचन** या सदरात केलेल्या समालोचनाचा गोषवारा. ]

“ ......नवमतवाद हा गेली दोन वर्षे मराठी वाङ्मयात एक वाद-विषय होऊन बसलेला असून, या वादातून उत्पन्न झालेल्या वादळाने नागपूर व बडोदे या दोन्ही ठिकाणची साहित्य संमेलने चांगलीच हादरवून सोडली. श्री. भा. वि. वरेरकर, श्री. प्र. के. अत्रे, श्री. के. नारायण काळे, श्री. वि. ह. कुलकर्णी, श्री. अनंत काणेकर, ‘ विभावरी शिरूरकर,’ ‘ चिकित्सक ’, श्री. प्रभाकर पाध्ये प्रभृती नवीन पिढीतील कुशल लेखक नवमतवादाचे कट्टे पुरस्कर्ते असून, गेल्या दोन वर्षात ‘ प्रतिभा, ’ ‘ किर्लोस्कर ’ इत्यादि नियतकालिके आणि जाहीर सभा यातून हा वाद चांगलाच रंगला. शिवाय अश्लीलता, पावित्र्य विडंबन इत्यादि उपवादांचे जे फाटे त्याला फुटले व फुटत आहेत, ते निराळेच. अशा या महत्त्वाच्या विषयावर शास्त्रीय स्वरूपाचे विवेचक पुस्तक लिहून त्याला स्पष्टता आणि निश्चितता आणण्याचा प्रयत्न केल्याबद्दल श्री. ‘ राजशेखर ’ यांचे आम्ही अभिनंदन करतो.

त्यांच्या या प्रबंधाचा परामर्ष घेण्यापूर्वी नवमतवादाविषयी आज कोणत्या कल्पना रूढ आहेत, याची छाननी थोडी तरी करणे अवश्य आहे. ‘ प्रतिभा ’ आणि मुख्यतः ‘ किर्लोस्कर ’ या नियतकालिकातून या वादाचे जे स्वरूप प्रकट झाले आहे, त्यात त्याच्या लैंगिक बाजूवरच फाजील भर दिलेला दिसतो. नवमतवादाला लैंगिक बाजू आहे, यात शंकाच नाही; व आर्थिक कलहाच्या वाढत्या उग्रतेमुळे संयुक्त कुटुंबपद्धतीच काय, पण संसार करणेही मुंबई, कलकत्त्यासारख्या औद्योगिक शहरातून आज अशक्य होत चाललेले असल्याकारणाने, दिवसेंदिवस लैंगिक बाजूवर जास्त भर दिला जावा हेही अगदी स्वाभाविक आहे. पण नवमतवाद म्हणजे नुसते लैंगिक स्वातंत्र्य नव्हे आणि स्वैराचार तर नव्हेच नव्हे. ‘ प्रतिभा ’ आणि विशेषतः ‘ किर्लोस्कर ’ या नियतकालिकातून नवमतवादाचा ज्या पद्धतीने पुरस्कार

करण्यात आला ती पद्धतच इतकी एकांगी होती की, त्यामुळे नवमतवाद म्हणजे लैंगिक स्वैराचाराचे तत्त्वज्ञान असा लोकभ्रम उत्पन्न झाला. पण ' किर्लोस्कर ' आणि ' प्रतिभा ' यातून होणारा नवमतवादाचा पुरस्कार जरी एकांगी असला तरीही त्यामुळे मतप्रसाराला पुष्कळच मदत झाली आहे हे विसरून चालणार नाही. परंतु या मतप्रसाराच्या एकांतिक पद्धतीमुळे नवमतवाद हा मुख्यतः लैंगिक चर्चेचा विषय आहे, असा जो भ्रम वाचकवर्गात उत्पन्न झाला होता, त्याचा निरास होणे अवश्य होते, व ते कार्य श्री. ' राजशेखर ' यांच्या या छोटेखानी प्रबंधामुळे चांगल्या रीतीने होईल अशी आम्हाला खात्री वाटते. श्री. ' राजशेखर ' यांनी नवमतवादाची शास्त्रीयता व तर्कशुद्धता सिद्ध करताना जीर्णमतवाद्यांच्या युक्तिवादावर जी टीका केली आहे, ती साधार व समर्पक असून, नवमतवादाची अपरिहार्यता त्यामुळे आपोआपच सिद्ध झाली आहे......"

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १६५८७
REFBK-0016597

[ शुक्रवार दि. १७-५-१९३५ रोजी 'केसरी' पत्रात प्रसिद्ध झालेल्या विस्तृत अभिप्रायाचा संक्षेप. ]

"...... सध्या नवे व जुने याचा झगडा बराच जोरात चालू आहे. जुन्याची बाजू शास्त्रीय दृष्टया नसली तरी समाजापुढे पुष्कळ प्रकारे मांडली गेली आहे. पण आज जो 'नवमतवाद' म्हणून समाजापुढे मांडला जात आहे तो केवळ प्रणयापुरता असून व्यापक नवमतवादाला बगलच देणारा आहे. नवमतावर त्यामुळे अन्याय होत असून समाजाचा बुद्धिभेद होतो आहे. अशावेळी श्री. राजशेखर यांनी या नवमतवादाचे स्पष्ट दिग्दर्शन करुन नवमतवादीयांवर व समाजावर उपकारच केले आहेत. संपूर्ण घटक म्हणून समाज जगतो व समाजाचे अस्तित्व उत्पादनावर अवलंबून असते हे त्याचे विचारसूत्र आहे. "सध्या भांडवलशाही नष्ट होऊन उत्पादक वर्गाच्या विकासाला अनुरूप अशी सामुदायिक समाज पद्धती निर्माण होणार आहे व या विहित कार्याचा जो पुरस्कार करील तोच खरा व शास्त्रशुद्ध नवमतवाद होय" या सिद्धान्ताच्या सिद्धतेसाठी लेखकाने अनेक शास्त्रांची माहिती देऊन यातील प्रत्येक बाजू चांगल्या तऱ्हेने मांडून दाखविली आहे. ...... भाषा अर्थगौरवपूर्ण व विवेचन शास्त्रपूर्ण असल्याने हा छोटा ग्रंथ जुन्या व नव्या मताच्या लोकांना वाचनीय वाटेल."

[ केसरीत अभिप्राय आला त्याच्या आगे मागे ( दिनांक मिळाला नाही. ) केसरीचे जुळे भावंड जो इंग्रजी ' मराठा ' ( आता निघत नाही. ) त्याने लिहिलेल्या विस्तृत परीक्षणातील संक्षिप्त भाग. ]

"This is a masterly little brochure in Marathi dealing with subject which seems to us has never been dealt with before in a scientific manner.

With remarkable Skill and Conciseness the author brings within the scope of 44 pages the entire range of discussion on historical materialism and does it with rare clarity and grasp of the subject he handles.

The historic roots of religion, science, art, political and economic development, growth of various forms of Society, its division into classes, the growth and development of modern Capitalism, the march towards Socialism, etc. are explained here with such scholarly detachment that makes it essential for every youthful public worker to make a thorough study of this pamphlet so as it enable him to have a sound grounding for his activities....... "

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम [illegible] दि: [illegible]
क्रमांक [illegible] नोंद दि: [illegible]

आगामी प्रकाशन :

## डाळिंबाचे दाणे

लेखक : पद्माकर चितळे

पुष्कीन, टॉलस्टॉय, गोगोल, चेकॉव्ह, दोस्तोवस्की, टर्जिनेव्ह, मॅक्झीम गॉर्की आणि शोलोकोव्ह या आठ अभिजात रशियन साहित्यकारांचा जीवन आणि साहित्यपट खुला करून दाखविणारा ललितरम्य शैलींत लिहिलेला ग्रंथ.

## शरच्चंद्र चटर्जी

लेखक : प्र. श्री. नेरुरकर

शरच्चंद्रांच्या साहित्याचा एका वेगळया दृष्टिकोनांतून केलेला अभ्यास.

अ भि न व प्र का श न, मुं ब ई १२.